सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ६३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २८ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## म्यानमार, थायलंडला ७.७ तीव्रतेचा भूकंप, इमारती कोसळल्या, अनेक बेपत्ता; बँकॉकमध्ये आणीबाणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८म्यानमार**

म्यानमारला शुक्रवारी भूकंपाचा मोठा धक्का बसला. हा धक्का एवढा तीव्र होता की, तो थायलंडची राजधानी बँकॉकमध्येही जाणवला. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ७.७ एवढी मोजली गेली. यात अनेक जण बपत्ता झाल्याचे वृत्त आहे.



म्यानमारमधील Sagaing हे भूकंपाचे केंद्र होते. या भूकंपामुळे म्यानमारमधील मंडाले येथील इरावती नदीवरील लोकप्रिय एवा ब्रिजही कोसळल्याचे वृत्त आहे. एवढेच नाही, तर चीन आणि तैवानच्या काही भागांनाही या भूकंपाचे धक्के जाणवल्याचे बोलले जात आहे.

या भूकंपाची तीव्रता एवढी तीव्र होती की, थायलंड आणि मॅनमारमधील अनेक शहरांतील इमारती अक्षरशः पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळल्या. बँकॉकमध्ये टॉवर्स कोसळले आहेत. तर डझनावर लोक बेपत्ता झाले आहेत. थायलंडमध्ये भूकंपात एकाचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे, तर ५० जण बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे. या भूकंपात हजारो लोकांचा मृत्यू झाल्याची शक्यता असल्याचे USGS चे म्हणणे आहे. महत्वाचे म्हणजे, मेघालयातील गारो हिल्समध्येही ४.० एवढ्या तीव्रतेच्या भूकंपाचे झटके जाणवले. म्यानमारमधील मांडाले शहरात भूकंपामुळे सर्वाधिक नुकसान झाले आहे. येथे अनेक मंदिरे आणि बौद्ध ठिकानांचेही नुकसान झाले आहे. सोशल मीडियावर भूकंपाचे अनेक व्हिडिओ व्हायरल होत आहेत. ज्यांत अगदी गगनचुंबी इमारतीही भूकंपाच्या धक्क्याने हलताना अथवा कोसळताना दिसत आहेत. तर अनेक इमारती झुकल्या आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्यानमार आणि थायलंडमधील भूकंपानंतरच्या परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. आपण म्यानमार आणि थायलंडमधील भूकंपानंतरच्या परिस्थितीबद्दल चिंतित आहोत. मी सर्वांच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना करतो. भारत सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. आम्ही प्रशासनाला या संदर्भात सतर्क राहण्यास सांगितले आहे. याच बरोबर, परराष्ट्र मंत्रालयाला म्यानमार आणि थायलंडच्या सरकारांशी संपर्कात राहण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. सर्वांच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना केली, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे.

याशिवाय, ढाका आणि चितगावसह बांगलादेशातील अनेक शहरांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. येथे रिश्टर स्केलवर भूकंपाची तीव्रता ७.३ एवढी होती. अद्याप येथून कसल्याही जीवितहानीचे वृत्त नाही.

## बाळासाहेबांच्या नावाखाली महापौर बंगला घशात घातला; उद्धव ठाकरेंच्या टीकेला मनसेचं प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यानिमित्ताने लावलेल्या बॅनरवर दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो लावण्यात आला होता. यावरुन मनसे आणि शिवसेना ठाकरे गटात जुंपली आहे. उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला टोला लगावला होता. उद्धव ठाकरेंच्या या टीकेला आता मनसेने प्रत्युत्तर दिलं आहे.



मनसे पदाधिकारी मुनाफ ठाकूर यांनी शिवाजी पार्क परिसरात गुढीपाडवा मेळाव्याचे बॅनर लावले आहेत. या बॅनरवर बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो लावण्यात आला आहे. याबाबत उद्धव ठाकरे यांनी म्हटलं होतं की,मनसेच्या सर्वांना बाळासाहेबांच्या नेतृत्वाशिवाय दुसरा पर्याय नाही, हे यातून दिसतंय. जर महाराष्ट्रात जिंकायचं असेल, गद्दारांनी देखील बाळासाहेबांचा फोटो वापरला होता. तसाच सगळ्यांना आता बाळासाहेबांचा फोटो वापरण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही.

उद्धव ठाकरे यांच्या टीकेवर बोलताना मनसे नेते संदीप देशपांडे यांनी म्हटलं की, माननीय बाळासाहेबांचा फोटो होर्डिंगवर लावणे हे पक्षाचं धोरण नाही .एखाद्या उत्साही कार्यकर्त्याची भावना असू शकते. पण उद्धव ठाकरेंना माझा प्रश्न आहे की, महापौर बंगला घशात घालायचा होता तेव्हा बाळासाहेब देशाचे, एरवी ते फक्त तुमचे वडील असं कस काय ?

**बाळासाहेबांच्या नावाखाली महापौर बंगला घशात घातला**

ज्या वेळेला आमच्या पक्षाची स्थापना होत होती तेव्हा बाळासाहेब ठाकरे बोलले होते की माझे फोटो लावायचे नाहीत. तेव्हा राज साहेबांनी ठरवलं की फोटो लावायचे नाही. आतापर्यंत आम्ही ते धोरण पाळत आलो आहोत. मात्र उद्धव ठाकरेंनी बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाखाली महापौर बंगला घशात घातला. खासगी जागेवर स्मारक बांधायला हवं होतं. मात्र तुम्ही पब्लिक प्रॉपर्टी घशात घातली, अशी टीका संदीप देशपांडे यांनी केली.

आमच्या कार्यकर्त्याचं आम्ही समर्थन करत नाही. मात्र बाळासाहेब ठाकरे तुमचे वैयक्तिक नाहीत, ते देशाचे आहेत, असंही संदीप देशपांडे यांनी म्हटलं.

## अमरावती विमानतळाला मिळाला 'आयएटीए' कोड राज्यातील तिसरे व्यावसायिक विमानतळ असेल




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

बडनेरानजीक बेलोरा येथील अमरावती विमानतळाला आयएटीए कोड मिळाला आहे. आयएटीए प्रमाण प्रवासी संस्थांना विमान कंपन्यांच्या वतीने विमान तिकिटे जारी करण्याची परवानगी देते आणि आरक्षण प्रक्रिया सुलभ करते. यापुढे संगणकावर अमरावती विमानतळाचा आयएटीए कोड 'एव्हीटी' म्हणून उमटणार आहे.

जगातील सुरक्षित, विश्वासार्ह, सुरक्षित आणि किफायतशीर हवाई सेवांना प्रोत्साहन देणे, विमान उद्योगाचे प्रतिनिधित्व करणे, नेतृत्व करणे आणि सेवा देणे हे आयएटीएचे ध्येय आहे. ही कार्गो आणि प्रवासी विमान वाहतुकीच्या भाड्यांचे निरीक्षण आणि नियुक्ती करण्यासाठी स्थापन केलेली संघटना अर्थात आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटना आहे.

**राज्यातील तिसरे व्यावसायिक विमानतळ**

एकदा कार्यान्वित झाल्यावर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी अंतर्गत अमरावती विमानतळ हा राज्यातील तिसरा व्यावसायिक विमानतळ असेल. विमानतळाने ३८९ हेक्टर क्षेत्र व्यापले. १८५० मीटर लांबी आणि ४५ मीटर रुंदीची धावपट्टी आहे. सध्या नाईट लैंडिंग सुविधा उभारण्याचे काम पूर्णत्वास आले आहे. येत्या काही दिवसांत अमरावती विमानतळाहून अलायन्स एअर लाईन्सची एटीआर ७२ मुंबई विमानसेवा सुरू होणार आहे.

**अमरावती यापुढे 'एव्हीटी' म्हणून उमटणार**

विमानतळाला नियुक्त केलेल्या आयएटीए कोडमध्ये तीन अक्षरे असतात आणि ती विमानतळ आणि शहराच्या नावांमधून तयार केली जातात. कोड बहुतेक शहराच्या नावातून निवडलेल्या अक्षरांनी तयार केले जातात. विमानतळांचे दोन अक्षरी कोड पहिल्यांदा १९३० मध्ये दिले गेले. त्यानंतर तीन-अक्षरी कोड वापरण्यास सुरुवात झाली. कोणताही संभाव्य गोंधळ टाळण्यासाठी जुन्या कोडच्या शेवटी एक्स जोडण्यात आला.

## उद्धव ठाकरे औरंगजेब फॅन क्लबचे अध्यक्षही होतील, चंद्रशेखर बावनकुळे यांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या नाशिक, धाराशीव, परभणी येथील खासदारांनी त्यांच्या रॅलीमध्ये पाकिस्तानचे झेंडे फडकवले. उद्धव ठाकरे यांनी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदूत्व पायदळी तुडवले. ज्या दिवशी मला काँग्रेससोबत जावे लागेल, त्या दिवशी मी माझे शिवसेनेचे दुकान बंद करेन, असे बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले होते. पण, उद्धव ठाकरेंनी स्वत: बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडले. मतांच्या लांगुनचालनासाठी उद्धव ठाकरेंनी धर्म सोडला, हिंदुत्वाचा विचार सोडला. भगव्या ध्वजाचा विचार सोडला. उद्धव ठाकरे हे औरंगजेब फॅन क्लबचे सदस्य झाले आहेत, पुढच्या काळात ते अध्यक्षही होतील, अशी टीका महसूल मंत्री आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे पत्रकारांशी बोलताना केली.



बावनकुळे म्हणाले, शिवसेनेचे नेते संजय राऊत यांना महाराष्ट्रातील जनतेने ऐकणे सोडले आहे. मला त्यांचे बोलणे ऐकू येत नाही, त्यामुळे त्यांच्याविषयी बोलून काहीच फायदा नाही. दिशा सालियन प्रकरणाचा अंतिम अहवाल येऊ द्यावा, आज या विषयावर मत प्रदर्शित करणे हे घाईचे होईल, असे मला वाटते.

दिशा सालियनच्या वडिलांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती, ते उच्च न्यायालयात गेले आहेत. जोपर्यंत पोलीस अंतिम निष्कर्षापर्यंत पोहचत नाही, तोवर माझ्या सारख्या व्यक्तीने बोलून तपासात यंत्रणेत अडथळा आणणे योग्य होणार नाही.नितेश राणे यांच्या वादग्रस्त व्यक्तव्याविषयी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात बावनकुळे यांनी राणे यांचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. बावनकुळे म्हणाले, नितेश राणे यांनी त्यांच्या वक्तव्याविषयी याआधीच स्पष्टीकरण दिले आहे. नितेश राणे यांच्यासोबत माझे वैयक्तिक बोलणे झाले आहे. या देशामध्ये राहणारा मुस्लीम समाज, जो या देशाचे भले करण्याचा विचार करतो, त्यांच्याबद्दल नितेश राणे यांचे काहीही म्हणणे नाही. पण, या देशामध्ये अनेक ठिकाणी दुर्देवी अशा घटना घडतात. पाकिस्तानचा संघ जिंकला की फटाके फोडले जातात. अनेक ठिकाणी पाकिस्तानचे ध्वज फडकवले जातात. आपल्या देशातील सर्व सोयी-सुविधांचा लाभ घेतात, पण पाकिस्तानचे गुण गातात, असे काही लोक आहेत. देशविरोधी, महाराष्ट्रविरोधी षडयंत्र रचण्याची काही ठिकाणे तयार झाली आहेत. त्या विषयाबद्दल नितेश राणे बोलले आहेत. जे भारतात राहून पाकिस्तानचे गुण गातात, त्यांच्यावर राणे यांचा आक्षेप आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले.

## प्रशांत कोरटकर याच्यावर कोर्टातून बाहेर पडताना वकिलाचा हल्ल्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८कोल्हापूर**


कोल्हापुरातील इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना धमकी दिल्याप्रकरणी आणि छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अवमानकारक विधान केल्याप्रकरणी प्रशांत कोरटकरला अटक केली आहे. त्याच्या पोलीस कोठडीत आज (दि.२८) आणखी दोन दिवसांची वाढ करण्यात आली आहे. दरम्यान, कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयातून बाहेर पडताना कोरटकर याच्यावर एका वकिलाने झडप घालत हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

वकील असीम सरोदे यांनी युक्तीवाद करताना म्हटले की, प्रशांत कोरटकर खोटारडे आहेत, हे समोर आले आहे. त्याने पुरावे नष्ट केले आहेत, हे स्पष्ट होत आहे. एका सट्टा बुकीच्या तो संपर्कात आहे. त्याची माहिती समोर येणे सुद्धा आता गरजेचे आहे. कोरटकर ६ ते ७ ठिकाणी राहिला आहे. त्यामुळे त्या त्या वेळी त्याने वेगवेगळ्या गाड्या वापरल्या आहेत. त्याचा तपास गरजेचा आहे त्यामुळे त्याला पोलीस कोठडीत ठेवणे गरजेचे आहे, असा युक्तिवाद सरोदे यांनी केला.

## मला अटक होईल, माझ्या जीवाला धोका कुणाल कामराची हायकोर्टात धाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

आंतरराज्य अटक टाळण्यासाठी कुणाल कामरा याने मद्रास हायकोर्टात धाव घेतली आहे. एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं केल्यामुळे कामराच्या अडचणी वाढल्या आहेत. एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी कामरा याला फोन करून जिवे मारण्याची धमकी दिली. इतकेच काय तर शिवसेनेच्या नेत्यांनीही कामराला इशारा दिला होता.



शिवसेना आमदार आणि कार्यकर्त्यांनी कामराच्या विरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली होती. पोलिसांकडून कुणाल कामरा याला दोन नोटिसा पाठवण्यात आल्या होत्या. अटक होण्याची शक्यता असल्यामुळे कुणाल कामरा याने मद्रास हायकोर्टात धाव घेतली आहे. माझ्या जिवाला धोका आहे, असे कोर्टात दाखल केलेल्या याचिकामध्ये कामरा याने म्हटले आहे.स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टिप्पणी केली होती. त्यानंतर मोठा दगारोळ उडाला. मुंबईसह दिल्लीमध्ये संताप व्यक्त करण्यात आला होता. वादात सापडलेल्या कुणाल कामरा याने मद्रास उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. कुणाल कामरा यांनी त्यांच्याविरुद्ध दाखल झालेलया गुन्ह्यामध्ये जामिनाची मागणी केली आहे.

## क्षयरोगमुक्त जिल्हा करण्यासाठी लोकाभिमुख चळवळ राबवावी - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

संपूर्ण जिल्हा लवकरच क्षयरोगमुक्त करण्यात येणार आहे. यासाठी प्रशासनासोबत नागरिकांनीही पुढाकार घ्यावा. जनजागृतीसाठी समाजमाध्यमांचा सुयोग्य वापर करावा. 'टीबीमुक्त ग्रामपंचायत' ही लोकाभिमुख मोहीम चळवळ म्हणून राबवावी, असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आज पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली टीबीमुक्त ग्रामपंचायत उपक्रमांतर्गत 'रौप्य महोत्सव गौरव सोहळा - २०२४'चे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.आमदार सर्वश्री प्रताप अडसड, केवलराम काळे, प्रवीण तायडे, राजेश वानखडे, प्रवीण पोटे - पाटील, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रमेश बनसोड आदी यावेळी उपस्थित होते.




पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २४ मार्च २०२३ रोजी वाराणसी येथे 'क्षयरोगमुक्त भारत' करण्याची घोषणा केली. त्याअनुषंगाने सर्व देश टीबीमुक्त होण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्हा टीबीमुक्त होण्यासाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरोग्य विभाग आणि ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने उत्तम प्रयत्न करीत आहेत. टीबीमुक्त ग्रामपंचायतींचा रौप्य महोत्सव गौरव सोहळ्यात संबंधित ग्रामपंचायतींना सन्मानित करण्यात आले आहे. अन्य ग्रामपंचायतींनेही त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन टीबीमुक्त ग्रामपंचायत व्हावी, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे. टीबीमुक्त झालेल्या रुग्णांच्या मुलाखती समाज माध्यमांवर प्रसारित कराव्यात. जेणेकरून अन्य रुग्णांनाही यातून आशेचा किरण मिळेल. यातून ते योग्य औषध उपचार करण्यासाठी प्राधान्य देतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी वासनी खु. सरपंच - अवंतिका वाटाणे, हयापूर - अवधूत हिगांटे, खिरगव्हाण - सुजाता सरदार, आंचलवाडी- वैशाली काळमेघ, हरताळा - नूतन काळे, सायत - अन्नपूर्णा मानकर, सावंगी संगम - पंकज शिंदे, कोरडा - सोनाजी सावळकर, कळमगव्हाण नलिनी वानखडे, रामगाव -छाया घरडे, टोंगलाबाद - वैशाली पांझाडे, अडगाव बु. - मंगला खडसे, बोर्डी - अतुल राऊत, डेहणी - शीतल राठोड, दिवानखेड -बाळासाहेब उईके, बेसखेडा- दुर्गा यावले, इसापुर - मनोज धोटे यांना प्रातिनिधिक स्वरूपात सन्मानित करण्यात आले. डॉ. सुरेश असोले यांनी प्रास्ताविक केले. श्रीकृष्ण पखाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रमेश बनसोड यांनी आभार मानले.

## संपादकीय ......

# खासदार मालामाल..!

सरकारी नोकरदारांना एक वेतनवाढ दरवर्षाला मिळते आणि खासगी कंपनीतील नोकरदारांना पाच ते दहा टक्के अपरेझल दरवर्षी होत असते. दर वर्षाला पगारवाढ देण्याचा उद्देश असा असतो की, त्या कर्मचार्याने मनःपूर्वक आपले काम केले पाहिजे. प्रोत्साहन म्हणून केलेल्या कामाची दखल म्हणून किंवा कसेही पण वार्षिक पगारवाढ ही सर्वत्र लागू होत असते. यावर्षी संसदेने नुकत्याच केलेल्या कायद्याप्रमाणे आपल्या लाडक्या खासदारांच्या वेतनामध्ये घसघशीत अशी म्हणजे सुमारे २४ टक्के पगार वाढ केलेली आहे. या पगारवाढीमुळे त्यांचे जीवनमान उंचावण्यात आणखी निश्चित मदत होईल. या उंचावलेल्या जीवनमानामुळे ते आपल्या मतदारसंघाकडे लक्ष देऊ शकतील. खासदार हा संसदेमध्ये जनतेचे प्रतिनिधित्व करणारा व्यक्ती असतो. त्यामुळे वाढलेल्या पगारामुळे खासदार देशाचे प्रश्न अधिक प्रभावीरीत्या मांडू शकतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

मंडळी, तुम्हाला असे वाटेल की, फक्त विद्यमान खासदारांच्या पगारात वाढ झालेली आहे की काय? तसे अजिबात नाही. पाच वर्षांपेक्षा ज्यांनी जास्त काळ खासदारकी भूषवलेली आहे त्या सर्व माजी खासदारांना निवृत्ती वेतन मिळत असते, त्यातही वाढ झालेली आहे. आता तुमच्या लक्षात आले असेल की, खासदार म्हणून एकदा का निवडून आले की, आयुष्यभर उदरनिर्वाह कसा चालावा, याची काळजी नसते. सर्व प्रकारचे भत्ते सोडून खासदारांना आता दरमहा सुमारे सव्वा लाख रुपये वेतन मिळणार आहे. भत्ते वेगळे असतात. कारण, खासदारांचे कामाचे स्वरूप वेगळे असते. मतदारसंघात दौरे करणे, संपर्क टिकवणे, संपर्क कार्यालय असणे, तिथे कर्मचारी असणे याचबरोबर विविध प्रकारचे भत्ते खासदार म्हणून मिळत असतात. पूर्वी खासदारांना भत्ते सोडून एक लाख रुपये वेतन मिळत होते, ते आता सव्वा लाख मिळणार आहे. खासदारांचा दैनंदिन भत्ता दोन हजारांवरून अडीच हजार करण्यात आला आहे. माजी खासदारांचे निवृत्ती वेतन पंचवीस हजारांवरून एकतीस हजार करण्यात आलेले आहे.

तुम्हाला असे वाटेल की, खासदार मंडळींना एवढेच लाभ आहेत का? नाही, नाही. थांबा! कार्यालयाचे अद्ययावतीकरण करण्यासाठी आणि मतदारसंघ भत्ता म्हणून ७० हजार रुपये त्यांना मिळतात. संसदेचे अधिवेशन सुरू असेल, तर दरमहा ६० हजार रुपये कार्यालयीन भत्ता आणि अडीच हजार रुपये दैनंदिन भत्ता मिळतो. याशिवाय फोन, इंटरनेट या वापरासाठी वार्षिक भत्ता मिळतो. दिल्लीत निवास व्यवस्था मोफत असते. खासदार स्वतः आणि त्यांच्या कुटुंबीयांना वर्षातून एकूण ३४ वेळेला संपूर्णपणे मोफत विमान प्रवास असतो. आता तुमच्या लक्षात आले असेल की, १२ महिन्यांमध्ये साधारणतः ३४ वेळेला खासदार विमानाने कुठेही जाऊ शकतात. तुम्हाला वाटले असेल की, खासदारांच्या सवलती संपल्या? नाही, थांबा! वैयक्तिक वापरासाठी कधीही कुठेही प्रथम श्रेणीचा रेल्वे प्रवास खासदारांना मोफत असतो. याशिवाय दरवर्षी ५० हजार युनिट वीज खासदार मंडळींना मोफत मिळते. इतके सगळे लाभ मिळणार असतील, तर खासदार होण्यासाठी कोण धडपड करणार नाही बरे? खासदार मंडळी इतकी मालामाल झाल्यानंतर त्यांनी चांगले काम करावे आणि मतदारसंघाकडे लक्ष द्यावे, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

# राजीव गांधी प्रभुयमानता (प्रगत) अभियान व अभियान

## व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण क्षेत्रीय कार्यालय प्रथम पुरस्कार

### सर्वांच्या सांघिक प्रयत्न प्रथमोषिकाची प्राप्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती, दि.२८–** रागांधी प्रचलीय गतिमानता (प्रगत) अभियान व २०२४–२५ अंतर्गत राज्य गुणोषिक विजेत्यांची अंमलबजावणी राज्य शासनाव्दारे (ता.२६) मार्च परिणाम करण्यात आली आहे. विभागीय स्तरावर उत्कृष्ट आय.टी.आय. सह, रोजगार मेळावे, संवाद फोरम या बाबींतर्गत सहसंचालक, शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयास १० लक्ष रुपयाचे प्रथमोषिक प्राप्त आहे. राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, प्रधान सचिव मनिषा वर्मा संचालक माधवी सरदेशमुख यांच्या मार्गदर्शन आणि विभागातील सर्व प्राचार्य, शिल्पघुपाल, अधिकारी–कर्मचारी यांच्या सांघिक प्रयत्नातून प्रथमोषिक प्राप्त, असे मनोगत सहचालक प्रदीप यांनी व्यक्त केले.




विविध घटकांत केलेल्या विकासकामांचा श्री. घुले आलेख मांडला. राजीव गांधी प्रभुत्वीय गतिमानता (प्रगत) अभियान व लोककरीता विभागातील कार्यरत ६३ राज्य आयआयए व २५ तंत्र उच्च माध्यमिक शाळांच्या विविध संसाधनांच्या योजनांचा विकास करण्यात आला असून २० ऑगस्ट ते २४ ऑक्टोबर २०२४ दरम्यान हे अभियान राबविणारे राब उत्तम आले आहे. राष्ट्रवादी २५ उत्कृष्ट आयटीआय निवडणे जरूर २४ आयटीआय एकटया अमरावती लोकशाही कार्यरत आहेत, असे त्यांनी सांगितले.

या उपक्रमांतर्गत प्रशासकीय कामांमध्ये, विशिष्ट लोकांभिमूख, ई–गव्हर्नन्स, वैशिष्ट्यपूर्ण व नाविनपूर्ण उपक्रम प्रशासकीय समावेश, प्रभारी देखावा करणे, विद्यार्थी हिताच्या प्रमुख कौशल्याधारित लोकशाही प्रमुख, मेवेळ आदि घटक विकास विकास आणि त्याचे कार्य. छायाचित्रण प्रमाणपत्र सादरीकरण राज्य शासन करण्यात आले आहे, असे श्री. घुले यांनी सांगितले.

विभागातील ६३ आयटीआयआयमध्ये विद्यार्थी चार्टर्ड डिजीटल लायब्री, स्मार्ट क्लासरुम, ओपन जीम, रेनवॉटर हारवेस्टींग, लॅन्डस्केपिंग, खेळाचे मैदान निर्माण केले असून सर्व संसाधनेयुक्त लॅब्स् – कार्यशाळा विकसित केल्या आहेत. ग्रामीण व्यापारी खरेदीसाठी उत्कृष्ट घडावे यासाठी १६ आयटीआय इनडोअर बॅडमिंट हॉल्स विकसित केले आहे. पेटीच्या सुप्त कलागुण तसेच तंत्र कलागुणांना वाव ओळखावा म्हणून विभागी तंत्र प्रदर्शन, पुल्लक, विरोध मेळावे, जानेवारी यासारखे विविध उपक्रम राबविले आहेत. कौशल्यपूर्ण विद्यार्थी–विद्यार्थी सहसंचालक कार्यालय येथे कार्यान्वित घडवून आणण्यासाठी स्वतंत्र निवासी प्रशिक्षण केंद्राच्या विभागातील ३५० कार्यरत नवनियुक्त शिल्पकार व्यावसायिक व सदस्यांचे प्रशिक्षण दिले आहे. अभियान मार्गत विभागाव्दारे सार्वजनिक संस्था०० कार्यक्रम मेळावे आयोजित करण्यात आले असून यामाध्यमातून सुमारे ५ हजार मुलांना–मुलींना, नामांकित आपनांमध्ये कामासाठी शुभेच्छा आहेत, असे श्री. घुले यांनी सांगितले.

आयटीआय प्रशिक्षण प्रशिक्षणामध्ये ग्रामीण भागांची संख्या जास्त असते. विद्यार्थी हा केद्री ट्रेनिंग त्यांना कौशल्यावर आधारित देवून उत्पादन व स्वयंरोजगार उभारणीसाठी नियमितपणे मार्गदर्शन व विभाग दिले जाते.

अग्रभागी विभाग सर्व आयोजक तंत्रज्ञान तंत्रज्ञानावर आधारित पीपीआयआय विभागांतर्गत इलेक्ट्रीक व्हेईकल, सो टेक्नॉलॉजी, आयटी, ए टेक्नॉलॉजी, रोबोटिक्स टेक्नोलॉजी, मॅक्ट्रोनिक्स यासारख्या पुढील यात नाही आहे.तालुका स्तरावर आयआयआयच्या प्राचार, गटनिदेशकांनी आयटी संस्थांच्या धरतीवर संस्था विकसित केल्या आहेत. विभागातील सर्वच अधिकारी–कर्मचाऱ्यांनी अभियानात उत्तम विकास कार्य केल्याने अमरावती विभागीय कार्यालय प्रथम क्रमांकाचे सदस्य आहेत. केवळ सर्व विभागातून अमरावती सर्वोत्कृष्ट काम केले आहे, त्याची ही फलश्रुती आहे, ते म्हणाले.त्यांच्या कारकिर्दीत सन २०१० घाटात आयटीआयला प्राचार्य असताना राज्यातून तृतीय क्रमांक ४ लक्ष रुपयाचा पुरस्कार लाभला होता. आता हांदा मोठा विभागस्तर प्रथम क्रमांकाचा पुरस्कार आहे. त्याबद्दल विभागप्रमुख या नात्याने राज्य सरकारचा आभारी असल्याचे त्यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले.

# उन्हाळ्यात फळबागा जिवंत ठेवण्यासाठी करा हे सोपे पाच उपाय; वाचा सविस्तर

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक**

यावर्षी पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यात दिवसागणिक उन्हाळ्यातील तापमान वाढत आहे. शेतकऱ्यांनी उपलब्ध पावसाचे योग्य व्यवस्थापन करून उन्हाळ्यात आपल्या फळबागा जिवंत ठेवणे गरजेचे आहे. पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी खाली दिलेल्या पद्धतीचा वापर करून उन्हाळ्यात फळबागा वाचवू शकतो.




**१) आच्छादनाचा वापर**

जमिनीतून होणाऱ्या पाण्याच्या बाष्पीभवनाचा वेग जमिनीवर आच्छादन करून कमी करता येतो. ही सर्वात सोपी पद्धत आहे. यासाठी फळबागेतील प्रत्येक झाडाजवळ सेंद्रिय पद्धतीने ५ ते ६ सें.मी. जाडीचे उसाचे पाचट, पालापाचोळा, वाळलेले गवत, काडीकचऱ्याचे थर द्यावेत. यामुळे जमिनीत ओलावा टिकून राहण्यास तसेच जमिनीत सेंद्रिय पदार्थांचा पुरवठा होऊन खताच्या खर्चात बचत होते. विशेषत: पाण्याचे बाष्पीभवन रोखले जाते. जमिनीतील ओलावा टिकून राहातो. याशिवाय आच्छादनामुळे मृद संधारण, जमिनीचे तापमान संतुलित राखणे, क्षारांचे प्रमाण कमी करणे, तणांचा बंदोबस्त करणे व मितीची संरचना सुधारणे इत्यादी प्रकारचे विशेष परिणाम दिसून येतात.

**२) हलकी छाटणी करणे**

झाडाच्या पानातील पाण्याचे उत्सर्जन कमी करण्यासाठी झाडावरील पानांची संख्या कमी असणे गणजेचे असते. त्यासाठी फळ झाडाची हालकी छाटणी करावी.




**३) बाष्परोधकांचा वापर**


पद्धतीमध्ये पानाचे पर्णरंध्रे बंद करणारे बाष्परोधक किंवा सूर्य किरणे परावर्तीत करणारे बाष्परोधक शेतकऱ्यांनी फळपिकामध्ये पर्णोत्सर्जन कमी करण्यासाठी वापरावे. त्यासाठी केओलीन पर्णरंध्रे बंद करणारे बाष्परोधकांचे सहाशे ते आठशे ग्रॅम १० लिटर पाण्यात द्रावण तयार करून १५ दिवसाच्या अंतराने दोन वेळा फवारणी करावी.

**४) वारारोधकाची उभारणी**

वाऱ्यामुळे जमिनीतील बाष्पीभवन आणि झाडाच्या पानातील पाण्याचे उत्सर्जन जास्त होत असते. त्यामुळे बागेच्या पश्चिम व दक्षिण दिशांना वारारोधक झाडांची लागवड करावी. उदा. शेवगा, सुरू, जांभुळ, करवंद इत्यादी झाडे लावावीत.

**५) मडका सिंचन**

पाण्याचे फारच दुर्भिक्ष असलेल्या ठिकाणी या पद्धतीचा उपयोग आपल्या बागा जिवंत ठेवण्यासाठी करावा. झाडाच्या वयानुसार मडकी वापरावीत. लहान फळझाडांच्या व कमी वयाच्या झाडांसाठी ५ लिटर क्षमतेची तर जास्त वय व मोठ्या झाडांसाठी १५ लिटर क्षमतेची मडकी वापरावीत. भर दुपारी झाडाखाली पडणाऱ्या सावलीवरून झाडाचे सावली क्षेत्र निश्चित करून दोन ते चार मडकी प्रति झाड ठेवावे. दर पंधरा दिवसाला मडक्यांची जागा बदलावी. निवडलेल्या मडक्याच्या तळाशी लहान छिद्रे पाडून त्यात कापडाची चिंधी बसवून सवली क्षेत्राच्या परिघावर ठेवावे व पाणी भरून झाकण ठेवावे.




**प्रा. संजय बाबासाहेब बडे**
सहाय्यक प्राध्यापक (कृषिविद्या)
दादासाहेब पाटील कृषि महाविद्यालय, दहेगाव, वैजापूर, छत्रपती संभाजीनगर




# डायबिटीस असेल तर आंबा खावा की नको? शुगर वाढते का?



**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक**

उन्हाळा सुरु झाला की, बाजारात सर्वत्र आंबे पाहायला मिळतात. आपल्यापैकी क्वचितच असा कोणी असेल ज्याला आंबा खायला आवडत नाही. हे फळ चवीला अगदी गोड आणि रसाळ असते. त्याच्या सुगंधामुळे खाण्याची इच्छा अधिक तीव्र होत जाते. याच्या गोड चवीमुळे मधुमेहाचे रुग्ण आंबा खाऊ शकतात का असा प्रश्न पडतो.

आंबा हा अनेक पोषकतत्वांनी भरलेले फळ आहे. यामध्ये कार्बोहायड्रेट्स, प्रथिने, अमीनो आम्ल, लिपिड्स आणि फायबर असतात.आंब्याच्या फळात कोलेस्टेरॉल नसते. तसेच कॅल्शियम, फॉस्फरस, लोह आणि जीवनसत्त्वे अ आणि यांचा भरपूर प्रमाणात समावेश असतो. १०० ग्रॅम आंबा खाल्ल्याने ६० ते ९० कॅलरीज मिळतात. तसेच यामध्ये ७५ ते ८५ टक्के पाणी असते.

आंब्यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त आणि चरबीचे प्रमाण कमी असते. याशिवाय हृदयरोग आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारापासून आपले रक्षण करते. आपण योग्य प्रमाणात आंबा खाल्ला तर त्यात असलेले फायबर पचन सुधारते. परंतु, मधुमेहाच्या रुग्णांनी आंबा कमी प्रमाणात खावा. आंब्याचा ग्लायसेमिक इंडेक्स हा ५१ आहे. फळांचा गोडवा यात असल्यामुळे फ्रुक्टोज आढळते. यामुळे रक्तातील साखर वाढत नाही. आंबा हा बटाटे, कडधान्य,तळलेले पदार्थ आणि उच्च कार्बयुक्त पदार्थांसोबत खाणे टाळायला हवे.

ग्लायसेमिक इंडेक्सनुसार अननस, टरबूज, बटाटे आणि ब्रेड यांचा ग्लायसेमिक इंडेक्स हा ७० पेक्षा जास्त असतो. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. डॉक्टर सांगतात की, ज्याच्या शरीरात रक्तातील साखरेचे प्रमाण अनियमित आहे, पोटॅशियमचे प्रमाण जास्त आहे अशा लोकांनी आंबा खाणे टाळावे.

आंबा खाण्याची योग्य वेळ कोणती?

डॉक्टर म्हणतात की, सकाळी फिरायला जाताना, व्यायाम केल्यानंतर आणि जेवणाच्या आधी फळे खाणे चांगले असते. जेवणासोबत आंब्याचे सॅलड देखील आपण खाऊ शकतो. जेवणाच्या वेळी आंबा खाणे चांगले कारण यावेळी रक्तातील साखरेची पातळी जास्त वाढत नाही. जेवणानंतर आंबा कधीही खाऊ नये. त्यामुळे रक्तातील साखर वाढते.

# व्यावसायिक संकुलाला भीषण आग: न्यू रसोई हॉटेल जळून खाक, आग नियंत्रणात आणताना यंत्रणेची दमछाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८यवतमाळ**

शहरातील एका व्यावसायिक संकुलाला लागलेल्या भीषण आगीत त्या संकुलात असलेले न्यू रसोई हॉटेल पूर्णतः जळून खाक झाले.

ही घटना बुधवारी २६ मार्च रोजी मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास उघडकीस आले. या आगीत हॉटेलमधील सर्व किंमती वस्तू व साहित्य पूर्णतः जळाल्याने हॉटेल मालकाचे सुमारे ५० लाखांपेक्षा अधिक रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

साई मंदिराच्या विरुद्ध बाजूला नांदेपेरा वळण रस्त्यावर असलेल्या व्यावसायिक संकुलाला बुधवारी मध्यरात्री अचानक आग लागली. या भागात गस्त घालणाऱ्या पोलिसांना व्यावसायिक संकुलातून धूर निघताना दिसला. त्यानंतर क्षणातच आग भडकली. पोलिसांनी अग्निशमन दलाला बोलावले.

अग्निशमन दलाची वाहने शीघ्र घटनास्थळी पोहचली. मात्र, तोवर आगीने रौद्र रूप धारण केले होते. यामुळे काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे



प्रयत्न केले. मात्र, आग विझेपर्यंत न्यू रसोई हॉटेल आगीच्या भक्षस्थानी सापडली होती. या आगीत भागीदारीमध्ये असलेले न्यू रसोई हॉटेल मधील किंमती वस्तू जसे ४ मोठे फ्रीज, ओव्हन, फर्निचर व इतर सर्व साहित्य पूर्णतः जाळून खाक झाले. त्यामुळे हॉटेल मालकाचे सुमारे ५० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.–

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २८ मार्च २०२५ शहर/ग्रामिण


# पावणे तीन लाख रोख असलेली बॅग प्रिया टॉकीजसमोरून लंपास

## कोतवाली पोलिस ठाण्यात लुटारूंविरुद्ध गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** शहरातील मुख्य बाजारपेठ व अतिशय वर्दळीचा मार्ग असलेल्या प्रिया टॉकीजसमोरून एका तरुणाच्या हातातील पावणेतीन लाख रुपये रोख असलेली बॅग तीन ते चार लुटारूंनी हिसकावली आहे. ही घटना गुरुवारी सायंकाळी ७ वाजता घडली आहे.

राजकमल चौक परिसरात आकाश आनंदानी यांचे मोबाइलचे दुकान आहे. याच दुकानात मंगेश वासुदेवराव काळे (२६, गोपालनगर, अमरावती) हा काम करतो. आकाश आनंदानी यांनी विकलेल्या मालाची वसुली करण्यासाठी गुरुवारी सायंकाळी मंगेश शहरातीलच मार्केटमध्ये गेला होता. काही दुकानातून त्याने रक्कम वसूलही केली होती. ही संपूर्ण रक्कम मंगेशने एका बॅगमध्ये ठेवली होती. मंगेश बॅग घेऊन प्रिया टॉकीजजवळ उभा असताना अचानक तीन ते चार अनोळखी लुटारू



आले व मंगेशकडे असलेल्या बॅगवर त्यांनी झडप मारली. या वेळी मंगेशने त्यांचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला मात्र लुटारूंची संख्या तीने ते चार असल्यामुळे ते रोख असलेली बॅग घेऊन पसार झाले. या बॅगमध्ये पावणे तीन लाख रुपयांची रक्कम असल्याचे कोतवाली पोलिसांनी सांगितले आहे. बॅगची ओढताण सुरू असताना मंगेशने प्रतिकार केल्यामुळे एका लुटारूने मंगेशला मारहाण केली. या मारहाणीत बॅगचा पट्टा तुटला आहे. या घटनेची माहिती मिळताच डीसीपी गणेश शिंदे, कोतवालीचे ठाणेदार मनोहर कोटनाके व कोतवाली पोलिस तातडीने घटनास्थळी पोहोचले होते. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

> फुटेजच्या आधारे लुटारूंचा शोध प्रिया टॉकीजसमोरून तरुणाच्या हातातील पावणे तीन लाख रुपये रोख असलेली बॅग लुटारूंनी पळवली आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने लुटारूंचा शोध सुरू केला आहे. –
> **मनोहर कोटनाके, ठाणेदार कोतवाली.**

शहरात दोन दिवसांत लूटमारीची भररस्त्यात घडलेली चौथी घटना शहरात अलीकडे गुन्हेगारीत वाढ झाली आहे. चोरी, घरफोडी, वाहनचोरी नित्याचीच झाली असताना मागील दोन दिवसांत भररस्त्यात लुटमारीची घडलेली ही चौथी घटना आहे. बुधवारी पहाटे एका कंत्राटदाराला चाकू मारून ७० हजार लूटले, त्यानंतर राजापेठच्याच हद्दीत एका १७ वर्षीय मुलाला मारहाण करून १२ हजार ४०० रुपयांचा ऐवज लूटला. त्यानंतर बडनेरा ठाण्याच्या हद्दीत एका तरुणाला गंभीर मारहाण केली आणि चौथी घटना गुरुवारी सायंकाळी कोतवालीच्या हद्दीत मुख्य बाजारात घडली आहे.

# समाज माध्यमांचा जपून वापर करा- ठाणेदार लुले

## नेरपिंगळाई येथे शांतता समितीची बैठक उत्साहात



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८नेरपिंगळाई–** सण आणि उत्सव हे आनंद, एकोपा आणि सौहार्द वाढवण्याचे साधन असले पाहिजेत. सर्व धर्मीयांनी एकत्र येऊन शांततेने आणि प्रेमाने सण साजरे करावेत, यामुळे समाजात बंधुत्वाची भावना वाढते. कोणत्याही सणाचा आनंद वाद–भांडणांमुळे गमावू नये, असे आवाहन शांतता कमिटीच्या बैठकीत शिरखेड पोलिस स्टेशनचे ठाणेदार सचिन लुले यांनी केले.

प्रत्येक धर्माच्या सणांना महत्त्व द्या आणि त्या सणांचे औचित्य समजून घेण्याचा प्रयत्न सर्व नागरिकांनी करणे गरजेचे आहे. शक्य असल्यास विविध धर्मीय उत्सवांमध्ये सहभागी व्हा. यामुळे परस्पर समजूत आणि सौहार्द वाढतो. कुठल्याही धर्माचा अपमान होणार नाही याची काळजी घ्या. सोशल मीडियावर किंवा प्रत्यक्ष व्यवहारात कुणाच्याही श्रद्धा दुखावणारे वक्तव्य करू नका. खोटी किंवा भडकावू माहिती शेअर करू नका. कोणतीही धार्मिक पोस्ट शेअर करण्याआधी ती सत्य आहे का, हे तपासा. अफवा आणि चुकीची माहिती समाजात तेढ निर्माण करू शकते. त्यामुळे सणाच्या काळात कुठलाही वाद निर्माण होणार नाही याची दक्षता घ्या. उत्सव साजरा करताना गोंधळ किंवा गैरवर्तन होणार नाही याकडे लक्ष द्यावे सार्वजनिक ठिकाणी सण साजरा करताना अन्य समाजधर्मियांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्या, असे आवाहनही ठाणेदार लुले यांनी केले.


शांतता कमिटीच्या बैठकीला गावातील प्रतिष्ठित नागरिक, सरपंच, पत्रकार, बीट जमादार मनोज कळसकर, पोलिस पाटील राजेश राऊत, वैभव घोगरे यांच्यासह विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करणारी तरुण मंडळी उपस्थित होती.

# अमरावतीच्या लेखकाला मोठा सन्मान

## सुनील यावलीकर यांच्या 'सरतं काही सोडू नये' पुस्तकाला राज्यस्तरीय वैचारिक साहित्य पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** अमरावतीचे ज्येष्ठ लेखक, चित्रकार आणि शिक्षक सुनील यावलीकर यांच्या 'सरतं काही सोडू नये' या पुस्तकाला राज्यस्तरीय उत्कृष्ट वैचारिक साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.



पुरस्कार वितरण सोहळा २८ मार्च रोजी वर्धा येथील बजाज सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात होणार आहे. प्रसिद्ध साहित्यिक–पत्रकार उत्तम कांबळे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. पुरस्कारामध्ये रोख रक्कम, मानपत्र आणि सन्मान चिन्हाचा समावेश आहे.

मारोतराव नारायणे स्मृती प्रतिष्ठान, वर्धा यांच्यातर्फे दरवर्षी दिला जाणारा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे. यावलीकर यांच्या या पुस्तकाला यापूर्वीही अनेक मान्यवर पुरस्कार मिळाले आहेत.

सुनील यावलीकर हे एक बहुआयामी व्यक्तिमत्व आहेत. ते उत्कृष्ट चित्रकार म्हणूनही प्रसिद्ध आहेत. त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन मुंबईच्या प्रतिष्ठित जहागीर आर्ट गॅलरीत आयोजित करण्यात आले होते. विशेष म्हणजे त्यांच्या मुलीनेही तिच्या चित्रांचे प्रदर्शन याच गॅलरीत भरवले होते. बाप–लेकीचे चित्र प्रदर्शन जहागीर आर्ट गॅलरीत झालेले हे संभवतः पहिलेच कुटुंब आहे.

# अंजनगाव पान पिंपरी, विड्याच्या पानांचे गाव:८५० शेतकरी घेतात उत्पादन, प्रामुख्याने बारी समाजातील शेतकऱ्यांचा व्यवसाय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अंजनगाव सुर्जी–** सर्दी, खोकल्याच्या आजारावरील औषधांमध्ये उपयोगात येणारी पान पिंपरी (लेंडी पिंपरी) अन् विड्याच्या पानांचे गाव अशी अंजनगाव सुर्जीची विशेष ओळख आहे. जिल्ह्यात अंजनगाव सुर्जीत असलेल्या पांढरी, खोडगाव, आडगाव या तीनच ठिकाणी ९० टक्के पान पिंपरीसह ४० टक्के विड्याच्या पानाचे उत्पादन घेतले जाते. येथील ८५० शेतकरी उत्पादक आहेत. पान पिंपरी आणि विड्याचे पान ही दोन्हीही नाजूक पिके असून यासाठी मोठ्या प्रमाणात परिश्रम घ्यावे लागतात. प्रामुख्याने बारी समाज दोन्हीचे उत्पादन घेत आहे. हा त्यांचा पारंपरिक व्यवसाय असून कधी तो मालामाल बनवतो तर कधी कफल्लक, तरीही त्यांनी पान पिंपरी, विड्याच्या पानाचे उत्पादन घेणे सोडले नाही.



जानेवारी महिन्यात वाफे तयार करून पान पिंपरी, विड्याच्या पानांची पेरणी केली जाते. त्यानंतर ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये पीक हातात येते. एकरी २.५ ते ३ लाखांचे उत्पादन होते. पान पिंपरी ५०० रु. किलो दराने विकली जाते. मात्र, सप्टेंबर महिन्यात ज्यावेळी पान पिंपरीला फुले येतात त्यावेळी विषाणूची झाडांना लागण झाली तर संपूर्ण झाडच सुकते व परिश्रम, पैसा वाया जातो. त्यामुळे उत्पादक शेतकरी विषाणूंना घाबरतात, अशी माहिती नागार्जुन पान पिंपरी तज्ज्ञ सुभाष थोरात यांनी दिली.

केंद्र सरकारने जिल्ह्यातील वैशिष्ट्य म्हणून पान पिंपरीला जीआय टॅगही दिला आहे. याचा फायदा लगेच होत नसला तरी येत्या काही दिवसांत शुद्धता, बाजार मूल्यानुसार निश्चितच फायदा उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे. त्यामुळे पान पिंपरी व विड्याच्या पानांचे गाव अशी अंजनगाव सुर्जीची ओळख कायम राहील, यात दुमत नाही.

अंजनगावात १५ वर्षांपासून पान पिंपरीसह विड्याच्या पानांचे उत्पादन घेतले जात आहे. आधी येथे ८० ते ९० टक्के विड्याच्या पानांचे उत्पादन घेतले जायचे. परंतु, आता ते ४० टक्क्यांवर आले तर पान पिंपरीचे उत्पादन ८० ते ९० टक्क्यांवर पोहोचले आहे. दोन्ही नगदी पिके असली तरी नाजूक विड्याच्या पानांची जपणूक करणे जिकिरीचे तर पान पिंपरीची जपणूक करणे सोपे असून, मागणीही चांगली असल्याने पान पिंपरीच्या उत्पादनाकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

# जिल्ह्यातील ४७ हातपंप दुरुस्तीअभावी बंद अवस्थेतपाण्याची टंचाई, टँकर, हँडपंपाभोवती गराडा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८मेळघाट–** ग्रामीण भागातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी गावागावांत हातपंप सुरू केले. परंतु योग्य व्यवस्थापना अभावी हातपंप बंद पडलेल्या अवस्थेत आहेत. आता उन्हाळ्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याने बंद हँडपंपामुळे वादाचे प्रसंग उद्भवत आहेत. हंडाभर पाण्यासाठी कामावर जाता येत नसल्याने खाडा पडत आहे. पूर्वी हातपंप बसवण्यासह दुरुस्तीचे काम जि. प.च्या यांत्रिकी विभागामार्फत करण्यात येत होते. ६ हजार २५ पैकी ५ हजार ९७८ हातपंप सुरू आहेत, तर ४७ हातपंप बंद आहेत. या विभागाकडे सध्या ७ पथके कार्यरत आहेत. विशेष म्हणजे या विभागाकडे स्वतःचे वाहन, दुरुस्तीसाठी लागणारा मजूर वर्ग ग्रा.पं.ने देणे अपेक्षित होते. मात्र, जिल्ह्यात ग्रा. पं. कडे मागील काही वर्षांपासून लाखो रुपयांची वसुली थकीत आहे. असे असताना गावखेड्यातील हातपंप बंद असल्यास याबाबतची तक्रार संबंधित ग्रामपंचायतीने पंचायत समितीकडे केल्यास अशा गावात हातपंप देखभाल दुरुस्ती पथक जाऊन हातपंप दुरुस्तीचे काम करतात.८४१ ग्रा. पं.च्या हद्दीत ६ हजार २५ हातपंप आहेत. यापैकी ४७हातपंप बंद आहेत. त्यामुळे हातपंप बंद असल्याच्या तक्रारी संबंधित ग्रामपंचायतीकडून पंचायत समितीकडे केल्या जातात. मात्र, कमी मनुष्यबळाअभावी दुरुस्तीची कामे वेळेवर होत नाही. त्यामुळे बरेचदा प्रतीक्षा करावी लागते. हँडपंप नादुरुस्त असल्याची ग्रा.पं.ने तक्रार केर यानंतर जिल्हा परिषदेच्या यांत्रिकी विभागाकडून प्रत्येक पंचायत समिती स्तरावर नियुक्त केलेले देखभाल व दुरुस्ती पथक हँडपंप दुरुस्तीची जबाबदारी पार पाडते. उन्हाळा सुरू होताच मेळघाटातील काही गावात पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत आटतात. यावर टंचाई आराखड्यातून उपाययोजना केल्या जातात. तसेच ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील हैंडपंप बंद पडला तर याबाबत तक्रार ग्रा. पं. कडून पंचायत समितीकडे केली जाते. याकरिता नाममात्र २,५०० रुपये शुल्क भरावे लागते. मात्र, बरेचदा वेळेवर काम होत नाही.



> **टैंकर, हैंडपंपभोवती गराडा**
> उन्हाळ्यात मेळघाटातील काही गावांत पिण्याच्या पाण्याची टंचाई भासते. यामुळे अशा गावांतील नागरिकांची तहान हैंडपंप किंवा टँकरच्या पाण्यावर भागवली जाते. या पाण्यासाठी गराडा घातला जातो हे विशेष.

# अमरावतीत धान्य अफरातफर करणाऱ्या १० रेशन दुकानांचे परवाने रद्द; गैरव्यवहार उघडकीस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** अमरावती जिल्ह्यात सरकारी स्वस्त धान्य दुकानांमधील गैरव्यवहार उघडकीस आला आहे. जिल्हा प्रशासनाने मार्च ते डिसेंबर या कालावधीत धान्याची अफरातफर करणाऱ्या १० दुकानांची अनुज्ञप्ती रद्द केली आहे.जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांच्या नेतृत्वाखाली विभागाने गेल्या १० महिन्यांत ६१ दुकानांची तपासणी केली. यात १० दुकानांमध्ये गंभीर नियमभंग आढळून आला. नोव्हेंबरमध्ये



तीन, एप्रिल आणि ऑगस्टमध्ये प्रत्येकी दोन आणि मार्च व ऑक्टोबरमध्ये प्रत्येकी एका दुकानाचे परवाने रद्द करण्यात आले. याशिवाय जानेवारीतही एका दुकानाचा परवाना रद्द करण्यात आला होता.कारवाई करण्यापूर्वी संबंधित दुकानदारांकडून खुलासा मागवण्यात आला होता. तपासणी केलेल्या सर्व ६१ दुकानांनी ही प्रक्रिया पूर्ण केली. त्यापैकी १० दुकानांविरुद्धच्या तक्रारी सिद्ध झाल्यानंतर त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आली.लाभार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या दुकानांशी संलग्न असलेल्या सुमारे अडीच हजार रेशनकार्डधारकांना नजीकच्या इतर दुकानांशी जोडण्यात आले आहे. यापूर्वी प्रत्येक दुकानातून सरासरी २५० कार्डधारकांना धान्य वितरित केले

# वाघोली येथील शेतकऱ्यांनी मानले जिल्हाधिकारी व माजी मंत्री यशोमती ताई ठाकुर यांचे आभार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती –** रतन इंडिया कंपनीच्या राखेच्या प्रदूषणामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले सदर बाब शेतकऱ्यांनी यशोमतीताई ठाकुर यांना सांगितली त्यांनी बाधित शेतकरी व मा.खासदार बलवंत भाऊ वानखडे व जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या सोबत २७ फेब्रुवारी ला जिल्हाधिकारी कार्यालय येथे बेठक घेतली व नंतर कंपनी व शेतकरी यांचे सोबत मीटिंग घेतली शेवटी



नुकसानग्रस्त शेकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली शेतकऱ्यांनी आनंदी होत शॉल ,बुके,व मिठाई देऊन यशोमती ताई ठाकूर व जिल्हाधिकारी यांचे आभार मानले .

यावेळी अनु.जाती विभाग कॉंग्रेस तालुका अध्यक्ष सुकुमार खंडारे,आशाताई चौहान,मनोज पंडागडे,झाबूलाल चौहान,कैलास इंगोले,इंदल भोसले, रामू खंडारे,सुनील खंडारे,शुभंकर पवार, ज्ञानेश्वरराव खंडारे,.....मलेश पवार,सुदामराव खंडारे,दादाराव खंडारे,अमोल पवार,गौरव खंडारे,बाबरावजी छापनी, अंकुश सायखेडे, सुमेध खंडारे,श्याम छापनी व अनेक शेतकरी हजर होते .

# उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री असताना जनतेला काय दिले?

## औरंगजेब फॅन क्लबचे म्होरक्या असल्याची टीका :बावनकुळे यांचा पलटवार:

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८नागपूर –** भाजपने सौगात ए मोदी ही योजना सुरू केली आहे. पण ही योजना सौगात ए मोदी नाही तर सौगात ए सत्ता आहे. बटेंगे तो कटेंगे हा नारा देणारे आता सौगात ए मोदी म्हणत असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली होती. त्यांच्या या टीकेला आता भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्यत्तर दिले आहे. हिंदुत्व आमच्या डीएनए मध्येच आहे. पण उद्धव ठाकरेंनी हिंदुत्वाचा त्याग केला आणि आता ते औरंगजेब फॅन क्लबचे म्होरक्या झाले असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून भाजप आणि नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला होता. मोदी सुरुवातीला मंगळसूत्र धोक्यात आहे, आता हिंदूंचे संरक्षण कोण करणार? असे म्हणाले होते. जे लोक आमच्या हिंदुत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत ते आता काय म्हणतील. भाजपने आता आपण हिंदुत्व सोडल्याची घोषणा करावी. भाजपने प्रथम विष वाटले, आता धान्य वाटत आहेत. ही चांगली गोष्ट आहे. पण त्यांनी आपले हिंदुत्व सोडले का किंवा त्यांची ही योजना केवळ बिहार निवडणुकीपर्यंत राहणार का? हे भाजपने स्पष्ट करावे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले होते. त्यावर आता बावनकुळे यांनी पलटवार केला आहे.

**हिंदुत्वावर बोलण्याचा तुम्हाला कुठलाही अधिकार उरलेला नाही**

या संदर्भात बावनकुळे यांनी एका पोस्टच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. यामध्ये ते म्हणाले की, 'हिंदुत्व आमच्या डीएनए मध्येच आहे. पण उद्धव ठाकरेंनी हिंदुत्वाचा त्याग केला. आणि आता ते औरंगजेब फॅन क्लबचे म्होरक्या झाले आहेत. सत्तेसाठी हिंदुत्वाचा वारसा सोडून काँग्रेसच्या दारात जाऊन बसले. त्यामुळेच जनतेने तुम्हाला घरी बसण्याचे तुमचे आवडते काम दिले. आता हिंदुत्वावर बोलण्याचा तुम्हाला कुठलाही अधिकार उरलेला नाही.

भाजपचा सौगात-ए-मोदी हा कार्यक्रम नाही, ही विकासाची गॅरंटी आहे. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या सरकारने देशाला २४ तास वीज, पाणी, रस्ते, घरं आणि रोजगार दिला. उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री असताना महाराष्ट्राच्या जनतेला काय दिले? मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर असताना ते घरात बसून राहिले आणि स्वतःच्या कार्यकर्त्यांशी नाळ तोडून टाकली. अहोरात्र जनसेवेचा ध्यास घेऊन देशसेवा करणाऱ्या मोदीजींवर बोलण्याची उद्धव ठाकरे यांची पात्रता नाही.

गुन्हेगार, बेकायदेशीर अतिक्रमण करणाऱ्या आणि समाजविघातक तत्त्वांना संरक्षण देणाऱ्या प्रवृत्तींचा मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र फडणवीसजी कायद्याच्या मार्गाने व्यवस्थित बंदोबस्त करीत आहेत. पण आता हेच लोकं उद्धव ठाकरेंना का प्रिय झाले आहेत? याची उत्तरं आधी त्यांनी जनतेला द्यावीत. अशी मागणी देखील बावनकुळे यांनी केली आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी गुढीपाडव्याला नागपूर दौऱ्यावर

## स्वागतासाठी भाजपची जंगी तयारी सुरु


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८नागपूर–** गुढीपाडव्याचे निमित्त साधून नागपुरात येत असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वागताची जय्यत तयारी भाजपने केली आहे. ते प्रवास करणार असलेला ३० किलोमीटरचा मार्ग आणि ४७ चौक सजविले जाणार आहेत. मोदी तब्बल १२ वर्षांनंतर रेशीमबागेतील स्मृतिमंदिरास भेट देणार आहेत. तिथे भेट देणारे ते पहिलेच पंतप्रधान ठरतील. त्यामुळे संघ स्वयंसेवकांमध्येही उत्साह संचारला आहे.

गुढीपाडव्याचा मुहूर्त साधून पंतप्रधान नागपूर दौऱ्यावर येत आहेत. यापूर्वी १६ सप्टेंबर २०१२ रोजी नरेंद्र मोदी स्मृतिमंदिरात गेले होते. त्यावेळी ते गुजरातचे मुख्यमंत्री होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरसंघचालक के. एस. सुदर्शन यांच्या अंत्यदर्शनासाठी ते आले होते. त्यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी, सरसंघचालक डॉ. मोहन भागवत तसेच, मोदी यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री व अन्य नेते आले होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तेव्हा भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षात मोदी यांचा दौरा ऐतिहासिक मानला जात आहे. माधव नेत्रालयाच्या इमारतीचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते होणार आहे. संघाच्या निमंत्रणावरून ते येत आहेत. आमगमनानंतर ते थेट रेशीमबागेत जातील. दीक्षाभूमीचे दर्शन घेतल्यानंतर दिल्लीला रवाना होण्यापूर्वी सोलार एक्स्प्लोझिव्हजची पाहणी करतील. पंतप्रधानांनी यापूर्वी दीक्षाभूमीस भेट दिली आहे. ठिकठिकाणी गुढी, मिठाईवाटप गुढीपाडवा आणि पंतप्रधानांचा दौरा याचे निमित्त साधून भाजप मोदींचे जंगी स्वागत करणार आहे. विविध ठिकाणी त्यांच्या भेटी व कार्यक्रम स्थळापर्यंतचा सुमारे ३० किलोमीटरचा मार्ग आणि ४७ चौक सुशोभित करण्यात येणार आहेत. यासंदर्भात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शहरातील प्रमुख पदाधिकारी व आमदारांशी एका बैठकीत चर्चा केली. भाजपचे भिन्नभिन्न मोर्चे, आघाड्यांकडून चौकाचौकांत विविध राज्ये, संप्रदायाच्या परंपरेनुसार वेशभूषा करून स्वागत केले जाणार आहे.





ठिकठिकाणी गुढी उभारून मिठाई वाटप केली जाईल. नागपूरकरांच्यावतीने होणाऱ्या स्वागताचा स्वीकार करण्यासाठी ताफ्याचा वेग कमी राहावा, अशी विनंती पालकमंत्री करणार असल्याचे समजते. त्यांनी दीक्षाभूमी व माधव नेत्रालय परिसराचीदेखील पाहणी केली. बैठकीत नूतन आमदार संदीप जोशी यांचा पक्षाच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष बंटी कुकडे, जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे, संघटन सचिव डॉ. उपेंद्र कोठेकर, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, आमदार चरणसिंग ठाकूर, माजी आमदार प्रा. अनिल सोले, सुधाकर देशमुख, विकास कुंभारे, सुधीर पारवे, राजू पारवे, मल्लिकार्जुन रेड्डी, जयप्रकाश गुप्ता, डॉ. राजीव गुप्ता, संदीप गवई, विष्णू चांगदे, माजी महापौर अर्चना डेहनकर आदी उपस्थित होते.

वेगळ्या राज्याच्या मागणीसाठी चार दिवसांपूर्वी अधिवेशन घेणाऱ्या विदर्भवाद्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यासाठी वेळ मागितली आहे. अन्यथा काळे झेंडे दाखवण्याचा इशाराही दिला. विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या एका शिष्टमंडळाने विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पंतप्रधान कार्यालयाशी संपर्क साधला. पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्र्यांनी राज्यघटनेनुसार वेगळ्या राज्याची प्रक्रिया सुरू करावी आणि १२० वर्षे जुन्या मागणीचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढावा, असे आवाहन करणारा ठराव समितीने सोमवारी संमत केला. समितीचे नेते अरुण केदार, अहमद कादर, सुनील चोखारे, मुकेश मासुरकर, नरेश निमजे, प्रशांत नखाते, ज्योती खांडेकर, गणेश शर्मा, राजेंद्र सतई, भोजराज सरोदे आदींची नावे भेटीसाठी पाठवण्यात आली आहेत.

### एसपीजीकडून कार्यक्रमस्थळांची तपासणी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमस्थळांची एसपीजीच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी तपासणी केली. त्यानंतर पोलिस आयुक्तालयातील तैनात करण्यात येणाऱ्या बंदोबस्ताबाबत माहिती घेतली. पंतप्रधान जाणार असलेल्या संपूर्ण मार्गाचीही पाहणी केली. दरम्यान, पंतप्रधानांच्या नागपुरात दौऱ्यानिमित्त संपूर्ण शहरात चार हजारांवर पोलिसांचा ताफा तैनात करण्यात येणार आहे. पोलिसांच्या मदतीला राज्य राखीव पोलिस दलाच्या पाच तुकड्या व दीड हजारांवर होमगार्ड तैनात करण्यात येतील. अन्य जिल्ह्यांतूनही सुमारे दीडशे अधिकारी बंदोबस्तासाठी मागविण्यात आल्याची माहिती आहे.

# यास्मिननगरात तरुणाने वृद्ध महिलेचा केला खून

## तरुणाची आईला मारहाण, वृद्धा मध्यस्थीला आली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** भांडणात मध्यस्थी करण्यास गेलेल्या एका वृद्धेचा काठीने हल्ला चढवून खून करण्यात आला. ही घटना गुरुवारी (दि. २७) सायंकाळी ७वाजता नागपुरी गेट ठाण्याच्या हद्दीतील यास्मिननगर येथे घडली. या घटनेनंतर नागरिकांनी मारेकऱ्याला चांगलाच चोप दिला.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला. अख्तर बी शेख नुरूल्ला (६०, रा. यास्मिननगर) असे मृत वृद्धेचे नाव आहे. तर शेख अख्तर शेख अयुब (२५, रा. यास्मिननगर) असे मारेकऱ्याचे नाव असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शेख अख्तर व अख्तर बी शेख नुरूल्ला हे शेजारी राहतात.

सायंकाळच्या सुमारास शेख अख्तरने त्याच्या आईला ईदनिमित्त कपडे घेण्यासाठी पैसे मागितले. त्यावर तू कुठलाही कामधंदा करत नाहीस, मी तुला कुठून पैसे देऊ, तुझे वडील आल्यानंतर त्यांना पैसे माग, असे त्या शेख अख्तरला म्हणाल्या. त्यामुळे शेख अख्तरने आई सुरैया यांना काठीने मारहाण सुरू केली. त्यावेळी अख्तरच्या शेजारी अख्तर बी शेख नुरूल्ला या दुकानात जाण्यासाठी घराबाहेर पडल्या. त्यावेळी त्यांना शेख अख्तर हा त्याच्या आईला मारहाण करताना दिसला.त्यामुळे त्यांनी त्याला हटकले. त्यांना मारू नकोस, अशी मध्यस्थीची भूमिका घेतली. मात्र, कोणाचेही ऐकण्याच्या मनःस्थितीत नसलेल्या शेख अख्तरने वृद्ध अख्तर बी शेख नुरुल्ला यांच्या डोक्यावर काठीने जोरदार प्रहार केला. त्यामुळे त्या जागीच कोसळून गतप्राण झाल्या. या वेळी नागरिकांनी शेख अख्तरला पकडून चांगलाच चोप दिला. त्यानंतर घटनेची माहिती नागपुरी गेट पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून जखमी शेख अख्तरला रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवला. या प्रकरणी शेख अख्तरविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केल्याची माहिती नागपुरी गेटचे ठाणेदार हनुमंत उरलागोंडावर यांनी दिली.–

# भरधाव ट्रॅव्हल व ट्रकची समोरासमोर भीषण धडक; १५ जखमी; दोन गंभीर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८चंद्रपूर :–** प्रवासी वाहतुक करणाऱ्या ट्रॅव्हल्स व हायवा ट्रकमध्ये समोरासमोर झालेल्या धडकेत २ जण गंभीर जखमी तर १३ जण किरकोळ जखमी झाल्याची घटना आज सोमवार २७ मार्च रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास ब्रम्हपूरी नागभीड रस्त्यावरील पोदार स्कुलजवळ घडली आहे. प्राप्त माहितीनुसार, नागपूर वरून ब्रम्हपूरीच्या दिशेने (एम.एच.४९ एटी ३०३० ) या क्रमांकाची प्रवासी वाहतूक करणारी ट्रॅव्हलस येत होती. या ट्रॅव्हल्स मध्ये ३० ते ३५ प्रवासी होते. ही ट्रॅव्हल्स चालक प्रचंड वेगाने चालवत होता. तेव्हा ब्रम्हपूरी–नागभीड रस्त्यावरील पोद्दार स्कुलपर्यंत ही ट्रॅव्हल्स पोहचली तेव्हा ब्रम्हपूरी कडुन नागभीडच्या दिशेने (एम.एच.४० सीटी ५६९०) या क्रमांकाचा हायवा ट्रक जात होता.अचानक या दोन्ही वाहनांमध्ये समोरासमोर धडक झाली.धडक इतकी भीषण होती की या धडकेत दोन्ही वाहनांचा समोरील भाग चेंदामेंदा झाला आहे. घटनेची माहिती मिळताच ब्रम्हपूरी पोलीसांनी घटनास्थळी दाखल होत जखमींना ब्रम्हपूरी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. व गंभीर जखमींना ब्रम्हपूरीतील खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले.यात ट्रक चालक आदीत्य विशाल ठाकरे (२४) रा.मोहाडी ता.नागभीड हे गंभीर जखमी झाले आहेत. तर ट्रक मधील क्लिनर कुणाल मडावी (३०) रा.नागभीड किरकोळ जखमी आहे.तर प्रवासी वाहतूक करणाऱ्या ट्रॅव्हल्स मधील गुड्डु गणपत धोंगडे (३७), जितेंद्र गेडाम (३४)रा.कुनघाडा चक ता.नागभीड, मुस्कान असल्म पठाण (२५)रा.नागभीड, दिपीका विनोद मत्ते (२९) रा.वर्धा, अजमल असल्म खा पठाण (३५) रा.नागभीड, चंद्रकला वामन ढोके (७०) रा.नागपुर, एकनाथ वामन गजभिये (४०) रा.बाम्हणी तह.चिमुर, कमल भास्कर ईलकटकल ( ७४) रा.इंदीरानगर नागपूर, सचिन वामन ढोके( ३२) रा.नागपुर, पवन मधुकर उराडे ( ३१) रा.चिमुर, सुनंदा भास्कर लोखंडे वय (२९)रा.रूई ता.ब्रम्हपुरी, निशांत सुखदेव मेश्राम (३९) रा.मुल अशी जखमींची नावे आहेत.

# महाराष्ट्रावर पुन्हा मोठे संकट; पुढील ५ दिवस धोक्याचे, हवामान खात्याचा नवा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८पुणे : –** गेल्या काही दिवसांपासून हवामानात सातत्याने बदल होताना दिसतोय. होळीनंतर अवकाळी पावसाचे ढग राज्यात बघायला मिळत आहेत. चंद्रपूर, लातूर, संभाजीनगर, सांगलीमध्ये जोरदार अवकाळी पाऊस झालाय. काही ठिकाणी विशेष: विदर्भात पारा हा ४० अंश सेल्सिअसच्या आसपास पोहोचल्याचेही चित्र बघायला मिळतंय. एकीकडे तापमान वाढत असतानाच अनेक ठिकाणी अवकाळी पावसाची हजेरी बघायला मिळतंय. सांगलीमध्ये जोरदार अवकाळी पाऊस झाला. पुढील पाच दिवस अवकाळीचे ढग अजून गडद होताना दिसत आहेत. हवामान खात्याकडून याबद्दलचा मोठा इशारा देण्यात आलाय.राज्यातील काही भागांमध्ये उष्णता वाढल्याने पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झालंय. दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज हा हवामान खात्याकडून वर्तवण्यात आलाय. यादरम्यान ताशी ३०–४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आलीये. मराठवाड्यातही अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आलाय. रत्नागिरी, सिंधुदूर्ग, कोकण, सातारा, कोल्हापूर, सोलापूर आणि सांगलीत हवामान खात्याकडून अवकाळी पावसाचा अंदाज देण्यात आलाय. विशेष: सोलापूर, कोल्हापूर, सातारा आणि सांगलीमध्ये पुढील चार दिवस ढगाळ वातावरणासह पावसाचा इशारा हवामान खात्याने दिलाय. दुसरीकडे लातूर, बीड, धाराशिव याठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा इशारा देण्यात आला असून यादरम्यान विजांचा कडकडाटासह पाऊस पडेल असा अंदाजा आहे.



### कोकण, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात अवकाळी

मराठवाड्यामध्येही ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. विदर्भात मात्र सातत्याने तापमानात वाढ होताना दिसतंय. अकोल्यात ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झालीये. राज्यात इतर ठिकाणी अवकाळी पावसाची हजेरी बघायला मिळतंय. मात्र, विदर्भात पारा वाढताना दिसतोय. चंद्रपूरमध्येही तापमान वाढताना दिसतंय. यामुळेच नागरिकांनी घराच्याबाहेर पडताना काळजी घेणे आवश्यक आहे. मुंबई शहर आणि उपनगरात आकाश मुख्यतः निरभ्र राहील. कमाल आणि किमान तापमान अनुक्रमे ३१ओउ आणि २२ओउ च्या आसपास असेल.

# उद्याला छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीवर होणार हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८कोरेगाव भीमा**

धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या ३३६व्या पुण्यतिथी कार्यक्रमानिमित्त शनिवारी (दि. २९) श्री क्षेत्र वढू बुद्रुक (ता. शिरूर) येथे समाधिस्थळी पूजाभिषेक, मूक पदयात्रा, शासकीय पूजा, कीर्तन, हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी, धर्मसभा, पुरस्कार वितरण, रक्तदान शिबिर व छावा महानाट्यासह विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती धर्मवीर संभाजी महाराज स्मृती समितीच्या सदस्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेला धर्मवीर संभाजी महाराज स्मृती समितीचे कार्यवाह मिलिंद एकबोटे, अध्यक्ष सोमनाथ भंडारे, समिती सदस्य अनिल काशिद, शांताराम भंडारे, सचिन भंडारे, माजी ग्रामपंचायत सदस्य संजय भंडारे, संभाजी भंडारे, अनिल भंडारे, ड बाळासाहेब भंडारे आदी उपस्थित होते.

धर्मवीर संभाजी महाराज स्मृती समिती, वढू बुद्रुक ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात पहाटे ५ वाजता श्री छत्रपतींच्या तसेच कविकलश यांच्या समाधीची महापूजा होईल, तर सकाळी ७ वाजता मूकपदयात्रा होईल. सकाळी ८.३० वाजता शासकीय पूजा व ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. अक्षय महाराज भोसले यांचे कीर्तन होईल, तर सकाळी ११.१५ वाजता शासकीय मानवंदना व वेदमंत्रपठणासह श्रीशंभू छत्रपतींच्या समाधीवर पुष्पवृष्टी होईल. सकाळी ११.३० वाजता धर्मसभा होईल.

धर्मसभेत श्रीक्षेत्र सरलाबेट येथील महंत परमपूज्य श्रीरामगिरी महाराज यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

सन्मानचिन्ह व ५१ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तसेच पिंपरी चिंचवडचे आमदार महेश लांडगे यांना श्रीशंभूतेज पुरस्कार देण्यात येणार आहे. त्याचबरोबर सुधीर बाळसराफ, भारतीय कामगार सेना, सावित्री बाई फुले पुणे विद्यापीठ आणि महेश भुईबार यांना उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते शंभूसेवा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमासाठी नांदेडहून ३०० शंभूभक्त अनवाणी पायाने दोन महिन्यांपासून प्रवास करून फाल्गुन अमावास्येला वढू येथे पोहोचणार आहेत.



मंत्रीसहित 'छावा' चित्रपटाच्या टीमची उपस्थिती

पुण्यतिथी कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, कॅबिनेटमंत्री चंद्रकांत पाटील, शिवेंद्रराजे भोसले, दत्तात्रय भरणे, बाबासाहेब पाटील, मेघना बोर्डीकर, माधुरी मिसाळ तसेच खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार ज्ञानेश्वर कटके, महेश लांडगे, दिलीप वळसे पाटील, माजी आमदार अशोक पवार आदींसह अनेक जण उपस्थित राहणार असून, यावेळी 'छावा' चित्रपटाचे निर्माते लक्ष्मण उत्तेकर व अभिनेता विकी कौशलसह टीमला तसेच धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराजचे निर्माते शेखर रघुनाथ मोहिते पाटील व अभिनेता अनुपसिंह ठाकूर यांना धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे सरपंच ज्ञानेश्वर भंडारे व रेखा शिवले यांनी सांगितले.

# कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अंतर्गत प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

अमरावती महानगरपालिके अंतर्गत महिला तक्रार समिती (विशाखा समिती) यांचे संयुक्त विद्यमाने कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत प्रशिक्षण कार्यशाळा आज दिनांक २७ मार्च,२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे संपन्न झाली.

प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, मुख्यलेखाधिकारी दत्तात्रय फिस्के यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे, उद्यान अधिक्षक श्रीकांत गिरी, कार्यालय अधिक्षक नंदकिशोर पवार, बाजार परवाना अधिक्षक उदय चव्हाण, वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रतिभा आत्राम उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचे रोप देवून स्वागत करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यशाळेत मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमेस हारार्पण करुन सदर प्रशिक्षण कार्यशाळेची सुरुवात करण्यात आली.

या प्रशिक्षणात सुखाय फाऊंडेशनच्या संचालिका श्रीमती सारीका वानखडे म्हणाल्या, महिलांनी कोणताही दबाव न घेता पुढे होऊन त्यांचेवरील शोषणाबाबत तक्रार दाखल करावी तसेच प्रशिक्षणामध्ये प्राप्त होणारी माहितीचा अवलंब प्रत्यक्ष कामकाज करावा. १० किंवा १० पेक्षा अधिक अधिकारी / कर्मचारी असलेल्या शासकीय/ खाजगी कार्यालयांकरीता शहरस्तरावर स्थानिक तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सदर प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये सुखाय फाऊंडेशनच्या संचालिका श्रीमती सारीका वानखडे यांनी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत विविध कलमांची माहिती दिली तसेच कामाचे ठिकाण, छळांचे प्रकार, तक्रार कोठे कशी करावी, अंतर्गत तक्रार निवारण समितीचे कार्य, तक्रारीचे निराकरण, स्थानिक तक्रार निवारण समितीचे कार्य याची सविस्तर माहिती दिली.

सदर प्रशिक्षण कार्यशाळा प्रास्ताविक वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रतिभा आत्राम यांनी केले. सदर प्रशिक्षण कार्यशाळेस सर्व महिला अधिकारी, कर्मचारी व कंत्राटी महिला कर्मचारी उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यशाळेत सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन दिपाली कोठेकर (भुस्कट) यांनी केले. सदर प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने परिश्रम घेतले.

# मोर्शी शहरातील कोट्यावधी रुपयांच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे

## नगर परिषद प्रशासन व कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे शहरातील नागरिक हैराण : अंकुश घारड यांनी दिला आंदोलनाचा ईशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २८ मोर्शी**

राज्य शासनाने मोर्शी शहर विकासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत मोर्शी नगर परिषदेला रस्ते बांधकामासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी मंजूर केला त्यामध्ये प्रभाग क्र. ९ मधील अमरावती अप्रोच रोड ( परशुराम मंगल कार्यालय) ते सुधाकर माकोडे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे व दोन्ही बाजूस गटारीचे काम करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे कामाकरीता ४ कोटी ५२ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले असून मात्र, नगर परिषदेमार्फत करण्यात येत असलेली सर्व कामे ही निकृष्ट दर्जाची होत आहेत. संबंधीत कंत्राटदाराच्या व नगर परिषद प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे कॉलनी परिसरातील नागरिकांना विद्यार्थ्यांना ज्येष्ठ नागरिकांना आपला मुठीत घेऊन तारेवरची कसरत करून



घराच्या बाहेर पडावे लागत आहे. मागील ४ महिन्यांपासून संपूर्ण रोड खोदून ठेवलेला असून संबधित कंत्राटदार या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करत असून या सिमेंट कॉंक्रिट रस्त्यावर पाणी सुद्धा टाकले जात नसेल तर कोट्यावधी रुपये खर्च करून बांधकाम सुरू असणाऱ्या रस्त्याचा दर्जा कसा असेल याकडे नगर परिषदेच्या बांधकाम विभाग अटी व शर्तींना डावलून सदर निधीचा संबंधीत कंत्राटदारालाच फायदा व्हावा म्हणून नगर परिषदेच्या कोट्यावधी रुपयांच्या निधीचा दुरुपयोग व विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू असल्याचा आरोप अंकुश घारड यांनी केला असून सदर रस्त्याचे बंद असलेले काम तात्काळ सुरू करून व जे कामे करण्यात आलेली आहेत. त्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, व ही चौकशी अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, गुणवता व नियंत्रण मंडळ महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत करण्याची मागणी अंकुश घारड यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

संबंधीत कंत्राटदाराच्या व नगर परिषद प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे कॉलनी परिसरातील नागरिकांना विद्यार्थ्यांना ज्येष्ठ नागरिकांना आपला मुठीत घेऊन तारेवरची कसरत करून घराच्या बाहेर पडावे लागत आहे. मागील ४ महिन्यांपासून संपूर्ण रोड खोदून ठेवलेला असून संबधित कंत्राटदार या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करत असून या सिमेंट कॉंक्रिट रस्त्यावर पाणी सुद्धा टाकले जात नसेल तर कोट्यावधी रुपये खर्च करून बांधकाम सुरू असणाऱ्या रस्त्याचा दर्जा कसा असेल याकडे नगर परिषदेच्या बांधकाम विभाग अटी व शर्तींना डावलून सदर निधीचा संबंधीत कंत्राटदारालाच फायदा व्हावा म्हणून नगर परिषदेच्या कोट्यावधी रुपयांच्या निधीचा दुरुपयोग व विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू असल्याचा आरोप अंकुश घारड यांनी केला आहे.

# महिला प्रचार मेळाव्यात १६८ पालकांची प्राथमिक निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

येथे राज्य तंत्रज्ञान जिल्हा तंत्रज्ञान तंत्रज्ञान, विकास आणि उद्योजकता केंद्र व तंत्र तंत्राचे मार्गदर्शन ' पंडित दीनदयाल उपाध्याय महिला पालन मेळावा ' आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यामध्ये २८० जागांसाठी ऑनलाइन आणि ऑफलाईन असे एकूण ४७० महिलांनी नोंदणी केली. तर प्रत्यक्ष १० नेत्यांनी ३. त्यामध्ये एकूण १६८ मूलांची प्राथमिक निवड करण्यात आली.


मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, राज्याचे तंत्रनिकेतन थेट प्राचार्य डॉ. विजय मानकर, कौशल्य विकास विभागीय कार्यालयाचे उप दत्तात्रय ठाकरे, सहायक सहायक प्रांजली बारस्कर आदि उपस्थित उपस्थित होते.

महानगरपालिका सार्वजनिक मेळाव्यास नियंत्रणे उपलब्ध करून देणे हे उपलब्ध करून देणे हे सहभागीच्या युगात जमाची आहे. तसेच कोणत्याही यशाला उत्कट नसतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार संबंधित धोरण स्वीकारणे आणि उद्योगाभिमुख बनविण्याचे कौशल्य विकासाचे प्रयत्न आहेत. रोजगारी शक्ती आणि उपलब्धता उपलब्ध करून देणारा लाभ घ्या, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती महापात्र यांनी केले.सर्व उपस्थित उद्योजकांचा सत्कार सत्कार करण्यात आला. मास्को प्रिसजन लिमिटेड, वोडाफोनीडिया लिमिटेड, टाटा ग्रीन आयोजिन प्रा. लि., क्रेडट क्सेस ग्रामीण लि., उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक, सुझलॉन एनर्जी, गिरनार गीअर्स प्रा. लि., बजाज अलायन्स प्रा. लि., टाटा स्ट्राईव्ह प्रा. लि. यासह एकुण १४ सार्वजनिक खुलासा पालकी मालकी हक्क निवडणे अल्पावधीतच नियुक्ती पत्र प्रदान करणे. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. अर्चना आलेगाव तर आभार कौशल्य विकास अधिकारी श्रीमती पवार यांनी दिली. विचारातले, शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र रहाटगाव येथे ३१ मार्चला महाराजांचा प्रकट दिन महोत्सव होणार साजरा : भाविकांसाठी महापर्वणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकटदिन महोत्सव ३१ मार्च रोजी दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र रहाटगाव येथे स्वामींचा प्रकट दिन महोत्सव मोठ्या थाटात साजरा होणार आहे .भाविकांसाठी ही सगळ्यात मोठी पर्वणी ठरणार आहे.श्री.स्वामी समर्थ महाराजांचा स्मरण दिन मोठ्या भक्ती भावाने दरवर्षी साजरा करण्यात येतो. स्वामी अद्भुत आहेत. स्वामी स्वयंभू, स्वयंसिद्ध आहेत. स्वामी अतर्क्य व अनुत्तम आहेत. श्री स्वामी समर्थ कल्याणकारी देवतांचे स्वामी आहेत. स्वामी अतींद्रिय स्मर्तृगामी म्हणजेच स्मरण करताच, हाक मारताच भक्तासाठी अवतीर्ण होणारे साक्षात ईश्वर आहे अशी समस्त भाविकांची श्रद्धा आहे. स्वामींचे महात्म्य आणि महिमा कालातीत आहे. दत्तात्रयांचे अवतार मानले गेलेले स्वामी अनेक मार्गांनी भक्तांच्या हाकेला धावून जातात. समस्या, अडचणी असल्या, प्रयत्न करूनही त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नसेल, तर स्वामींना मनापासून हाक मारली, तर दिलासा मिळतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. समस्या संपत नाही, अडचणी थांबत नाहीत, संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडत नाही, कठोर मेहनत आणि परिश्रम घेऊनही काहीच होत नाही, अशी जेव्हा भावावस्था होते, तेव्हा श्री स्वामी समर्थ महाराजांचे पारायण भावीक करतातस्वामी प्रकटदिनाचा उत्सव स्वमिसुत महाराजांनी सुरु केला आहे. ज्यावेळी स्वमिसुत महाराज हा उत्सव अक्कलकोट मधे करत होते तेव्हा भुजंगा सारख्या भक्तांनी स्वामिना प्रश्न विचारला स्वमिसुत हे काय करत आहेत तेव्हा स्वामींचे उत्तर असे होतेमाझा बळ मी सदेह ज्या प्रकटलेल्या दिवसाचा उत्सव करत आहे. नाना रेखी नावाचे अहमदनगर चे स्वामीभक्त होते ते स्वमिसुतांच्या सांगण्यावरून अक्कलकोट ला आले होते तर ते पिंगला जोतिष्य विद्येत पारंगत होते. स्वामिनी त्यांना आज्ञा केली कि माझी कुंडली




बनव तेव्हा त्यांना खूप आनंद झाला आणि त्यांनी लगेचच कुंडली बनवण्याचं काम सुरु केल. आणि काही दिवसातच कुंडली बनली आणि त्यातील स्वामी प्रकटण्याचा मजकूर वर प्रमाणे होता, तर ते ती कुंडली घेऊन स्वामींपाशी आले तेव्हा तिथे भजनाचा कार्यक्रम सुरु होता. तेव्हा स्वामींनी ती कुंडली भक्ताला सांगून माळ्यावर टाकायला सांगितली आणि ज्यावेळी कार्यक्रम संपला आणि परत स्वामिनी कुंडली आणण्याची आज्ञा केली तेव्हा त्या कुंडलीवर हळद, कुंकू, अक्षता, तुळस, फुले वैगेरे वाहून सर्व दैवतानि त्या कुंडलीची पूजा केली होती. आणि कुंडली पाहून स्वामींनी खूप खुश आणि नानांचा उजवा हात हातात घेऊन त्यांनी आपला हात हातात त्याच्या ठेवला आणि त्याच्या हातावर विष्णुपद उमटले स्वामींचे आत्मलिंग आणि ते त्यांच्या हयाती पर्यंत होते त्यांच्या हातावर. याचाच आर्थ स्वामिनी वरील कुंडलीला म्हणजे प्रत्यक्ष रित्या स्वामीसुतानी मांडलेल्या स्वामींच्या प्रकटन्यालाच मान्यता दिली आणि त्याचा प्रसाद म्हणून नाना रेखींच्या हातावर विष्णुपद उमटले. आणि आजही हि स्वामींची कुंडली स्वामींच्या अहमदनगर च्या मठात आहे. स्वामी समर्थ महाराज कादूर्लीवनात योग्यांना मार्गदर्शन करायला येण्यापूर्वी ते जगात वेगवेगळ्या ठिकाणी स्वताचे खरे नाव, ओळख लपवून चंचलभारती, दिगंबर बुवा आशा नावाने सुद्धा कार्यरत होते.आजच्याच दिवशी हा 'अक्कलकोटस्थ परब्रह्म' आपल्या सर्वांच्या पुर्वपुण्याईने आपल्याला प्राप्त झाला होता. या भूतलावर अवतीर्ण होऊन सर्व जगतावर अंनत उपकार करणाऱ्या परब्रह्माचा आज प्रकट दिन वा जयंती महोत्सव आहे. हा महोत्सव कोट्यावधी स्वामी भक्तांना नव ऊर्जा, ध्येर्य, दिलासा आणि अगाध करुणा प्रदान करणारा आहे. सूर्याला तेज पुरविणारा आणि मातेच्या ऱ्हदयात ममता निर्माण करणारा, तेजरुपी मायासागराचा धनी असलेला, आपला 'श्री स्वामी देव' याच चैत्र शुध्द द्वितिया शके १०७१ (इ. स. ११४९) मध्ये छेली या खेडे गावी प्रकट झाला होता. आपल्या परब्रह्माचा जन्म जेवढा आश्चर्यकारक आहे, त्यापेक्षा लाख पटीने जास्त आश्चर्यकारक त्यांचे जीवन चरित्र आहे. हे आपल्या सर्वांना ज्ञात आहे. इ. स. ११४९ ते १८७८ हा स्वामींचा अवतार काळ मानला जातो. परंतु ११४९ पुर्वी आणि १८७८ नंतर ही दृश्यादृश्य स्वरूपात स्वामींची लीला चालूच होती व आजही चालूच आहे.स्वामींच्या प्रकट दिनानिमित्त सायंकाळी ५ वाजता पालखी निघेल व ७ .३० ला भजनाचा कार्यक्रम होईल. चला तर मग सर्व भाविक भक्त आपण स्वामींचा प्रगट दिन मोठ्या उत्साहात साजरा करूया.

# हल्दीरामचे एक्सपायरी ताक विकणाऱ्या दुकानदारावर गुन्हे दाखल

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या आंदोलनाला यश हल्दीराम यांचे ताक पिल्याने पत्रकारांना विषबाधा प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

हल्दीराम यांचे एक्सपायरी ताक विकणाऱ्या सुगंध डेली नीडस अँड पान सेंटर या दुकानदारांवर सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाई करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भअध्यक्ष नयन मोंढे यांच्या नेतृत्वात तब्बल दोनदा जिल्हा कचेरीवर आंदोलने करण्यात आली.आंदोलनाला अखेर यश आले आहे.सिटी कोतवाली पोलिसांनी हल्दीराम चे ताक पिल्यामुळे पत्रकारांना विषबाधा झाली का ? याबाबतचा खुलासा मागितला होता. त्यानंतर जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टरांनी पत्रकारांना हल्दीराम चे एक्सपायरी झालेले ताक पिल्यामुळे विषबाधा झाल्याचे पत्र दिले होते. त्यानंतर सिटी कोतवाली पोलिसांनी




एक्सपायरी झालेले ताक विकणाऱ्या सुगंधी डेली निड्स अँड पान सेंटरचे मालकावर भारतीय न्याय संहितेच्या कलम १२५, २७५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

जिल्हा मराठी पत्रकार भावन येथे ११ मार्च २०२५ रोजी हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या पत्रकार परिषद मध्ये पत्रकारांना हल्दीराम चे मॅन्युफॅक्चरिंग ७ एप्रिल २०२४ तर ६ ऑक्टोबर २०२४ एक्सपायरी डेट असलेले ७ महिन्यापूर्वीचे एक्सपायरी असलेले हल्दीराम यांचे झटका मटका मसाला ताक देण्यात आले होते. हल्दीराम यांचे ताक पिल्याने देशोन्नतीचे पत्रकार विनोद इंगळे, सिटीस्कॅन यूट्यूब चैनल च्या संपादिका अर्चना रक्षे, वंदे भारत न्यूज चैनल चे पत्रकार सोमेश्वर जेवडे या तीन पत्रकारांना विषबाधा झाली होती. त्यामध्ये विनोद इंगळे व सोमेश्वर जेवढे या दोन पत्रकारांना जिल्हा सामान्य रुग्णालयात तब्बल चार दिवस उपचार करावे लागले होते. हल्दीराम यांचे एक्सपायरी ताप विकणाऱ्या दुकानदारावर कारवाई करण्यात यावी ही मागणी घेऊन सातत्याने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भाध्यक्ष नयन मोंढे यांनी पाठपुरावा केला आहे. जिल्ह्यात अश्या प्रकारे एक्सपायरी तारीख संपलेले शितपेय विकणारी अनेक दुकाने आहेत. त्या सर्व दुकानाची तपासणी करून दोषी आढळणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्यात यावी.काही दुकानदार पैशांसाठी एक्सपायरी तारीख संपलेली उत्पादने विक्री करून नागरीकांच्या आरोग्याशी खेळत आहे. त्यामुळे गोरगरीब नागरीकांना आपला जिव गमवावा लागतो. या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने निषेध व निदर्शने आंदोलन केले होते. आंदोलनात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भाध्यक्ष नयन मोंढे, शहराध्यक्ष विक्रम ढोके,विनोद इंगळे, मंगल प्रहरचे संपादक सुधीर गणवीर,मनिष गुढधे, अर्चना रक्षे, सोमेश्वर जेवडे,संजय तायडे,नकुल नाईक, धनराज खर्चान,राजा वानखडे,नितीन मुळे,मिनाक्षी कोल्हे, उज्वल भालेकर, स्वप्निल सवाळे,संजय मोहोड, यांच्यासह बहुसंख्य पत्रकारांनी मुद्दा लावून धरला होता.

# एमआयडीसीत पुन्हा जबरी लूट ट्रिपलसिट आरोपींविरुद्ध गुन्हा

## मोबाइल, रोख लांबविली :राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

बांधकाम साइटवर जात असलेल्या दुचाकीस्वार कंत्राटदारावर चाकूने वार करून त्यांच्याकडील रोख हिसकावण्यात प्रकार २६ मार्च रोजी पहाटे जुना बायपास मार्गावर घडला होता. त्या घटनेची शाई वाळते न वाळतेच एमआयडीसी भागात पुन्हा एकाला लुटण्यात आले. २६ मार्च रोजी रात्री ९:१५ ते ९:३० च्या सुमारासएमआयडीसीतील श्याम टाइल्ससमोर ती घटना घडली.

याप्रकरणी, प्रवीण (१७, शहा प्लास्टिक कंपनी, मूळ गाव शेलू कवठा) याच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी २६ मार्च रोजी एकाच दुचाकीहून आलेल्या तीन अज्ञातांविरुद्ध गुन्हा नोंदला. प्रवीण हा कटिंग करून पायदळ घरी जात असताना एका दुचाकीवरील २० ते २५ वर्षे वयोगटातील तीन मुले हे पुढे जाऊन पलटून फिर्यादीजवळ आले. पैकी दोघे खाली उतरले. त्यांनी तुझ्याजवळ काय आहे, अशी विचारणा केली. दोघांनी मनगटावर, पायावर मारले. तथा हाताबुक्क्यांनी मारहाण करत त्याला लुटले.

# आरोग्य विभागात मेळघाटातील हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तींचा मार्ग मोकळा

## २७ कर्मचाऱ्यांची सपाटीवर पदस्थापना जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाची प्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

मेळघाटातील स्थानिक हंगामी फवारणी कर्मचारी रिक्त जागेअभावी नियुक्तीच्या प्रतिक्षेत असताना गुरुवारी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने २७ कर्मचाऱ्यांना मेळघाटातून सपाटीवर पदस्थापना दिली आहे. त्यामुळे आता नियुक्तीच्या प्रतिक्षेत असलेल्या ३४ कर्मचाऱ्यांचा नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. सदरची प्रक्रिया जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांच्या अध्यक्षतेखाली राबविण्यात आली.

आरोग्य विभागात गट क संवर्गातील अनुसूचित क्षेत्रात सन २०२३ च्या जाहीरातीनुसार आरोग्य सेवकांना (पुरूष) ५० टक्के हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी म्हणून नियुक्ती द्यावयाची होती. दरम्यान सदर




प्रकरण न्याय प्रविष्ट झाल्यानेजिल्ह्यात ३४ उमेदवारांचे मेळघाट मध्येस्थानिक उमेदवारामधून सरळसेवेव्दारे नियुक्ती आदेशदेखीलरखडलेहोते. दरम्यान याबाबत न्यायालयाचा निर्णय लागल्याने ३४ कर्मचारी मेळघाटात नियुक्तीच्या प्रतिक्षेत होते. त्यांच्याकरिता जागा उपलब्ध करून देण्याकरिता आरोग्य विभागाकडून मेळघाटातील २७कर्मचाऱ्यांची सपाटीवर नियुक्ती करण्यात आली आहे. टप्प्याटप्प्याने इतर कर्मचाऱ्यांना देखील सपाटीवर नियुक्ती देण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात कर्मचाऱ्यांची मेळघाटवारी संपणार आहे. आरोग्य विभागाकडून या प्रक्रियेला येथील अधिकाऱ्यांमुळे चांगलीच गती आली आहे. समुपदेशनाच्या प्रक्रियेकरिता राजेश रोधे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी लिलाधर नांदे, ईश्वर राठोड, वरीष्ठ सहायक पुरूषोत्तम ठाकरे यांनी परिश्रम घेतले.

## पालकमंत्री बावनकुळे यांची गंगा सावित्री निवासस्थानी सांत्वना भेट...



अमरावती जिल्ह्याच्या मा.खा.नवनित रवि राणा यांच्या मातोश्री व आ.रवि राणा यांच्या सासु स्व.रजिंदर कौर हरभजनसिंग यांना श्रद्धांजली देण्याकरिता गंगा सावित्री निवासस्थानी आयोजित सांत्वना बैठकीमध्ये महसुल मंत्री ना.श्री.चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांनी सांत्वना भेट देऊन नवनित रवि राणा यांचे केले सांत्वनआई जाण्याचे दु:ख न विसरण्यासारखे असल्याचे ते यावेळी म्हणाले.

## आपत्ती व्यवस्थापनाच्या सूचनांनंतरही परिक्षेच्या वेळापत्रकात बदल नाही

### शिक्षण विभागाचा अजब कारभार : विद्यार्थ्यांना सरबत द्या , पण परिक्षा मात्र उन्हातच घ्या!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

राज्यात सर्वत्र उन्हाचा पारा वाढत चाललाय , उन्हाची तीव्रता लक्षात घेता राज्य शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाने निर्गमित केलेल्या परिपत्रकात विद्यार्थ्यांचे आरोग्य व वाढत्या तापमानापासून बचावाच्या दृष्टीने काही तरतुदी केल्या आहे. त्यानुसार शाळेत शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना ताक ,सरबत , द्यावे. शाळा सकाळच्या सत्रात भरवावी , उष्माघातापासून बचावाच्या उपाययोजना कराव्या अशा विवीध तरतुदी करण्यात आल्या आहे. परंतू आपत्ती व्यवस्थापन समिती च्या या निर्देशानंतरही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे कडून इयत्ता १ ली ते ९ वी च्या परिक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आलेला नाही. विद्यार्थ्यांना सरबत , ताक , ओआरएस द्या परंतू परिक्षा मात्र एप्रिल च्या शेवट च्या आठवड्यात तळपत्या उन्हातच घ्या असा अट्टाहास राज्याच्या शिक्षण विभागाकडून केल्या जात असल्याचे दिसून येते. एकीकडे उन्हाची तिव्रता लक्षात घेता , इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षा फेब्रुवारी , मार्च महीण्यात आटोपल्या जातात परंतू दुसरीकडे प्राथमिक विद्यार्थ्यांच्या अगदी १ ली, २ री च्या विद्यार्थ्यांच्या परिक्षा मात्र रखरखत्या उन्हात एप्रिल च्या शेवटच्या आठवड्यात घेणे ही बाब शिक्षण विभागाची असंवेदनशीलता व निष्ठूरतेचे उदाहरण म्हणावे लागेल.एप्रिल महिण्याच्या रखरखत्या उन्हात लहानग्या चिमुकल्या विद्यार्थ्यांची परिक्षा घेवून विद्यार्थ्यांना वेठीस धरण्याचा शिक्षण विभागाचा हेतू काय आहे हे मात्र कळायला मार्ग नाही.



**.... आतातरी वेळापत्रकात बदल करा!**

एप्रील च्या शेवटच्या आठवड्यातील वाढते तापमान, शाळांमधील अपु-या भौतिक सुविधा , विद्यार्थ्यांचे वय व आरोग्य या बाबी एससीईआरटी ने परिक्षेचे वेळापत्रक ठरवताना लक्षात घ्यायला हव्या होत्या. आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून दिलेल्या सुचनांची दखल घेवून आता तरी एससीईआरटी ने शालेय परिक्षेच्या वेळापत्रकात बदल करावा.

**राजेश सावरकर,**
**राज्य प्रसिध्दी प्रमुखमहाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

## चुकीच्या नावांची दुरूस्ती तत्काळ करा : जिल्हाधिकारी व तहसिलदारांचे आदेश

### पारदर्शी व स्वच्छ प्रशासनाची चाहुल मेळघाटात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८धारणी**

तालुक्यातील कासमार गावाचे शेतकरी शालिकराम कास्देकरच्या शेताच्या सातबारावर चुकीने ऑनलाईन प्रक्रियेत काळमा केन्ठे नाव आल्याने कास्देकर कुटूंबिय मालकी हक्कास मुकलेले होते. तर विविध योजनांचा पण त्यांना लाभ मिळत नव्हता. याविषयी जिल्हाधिकाऱ्यांकडे फिर्याद केली असता चुक दुरूस्ती करण्याचे आदेश प्राप्त झाले. तहसिलदार प्रदीप शेवाळे यांनी तलाठीस आदेशित केल्याने आदिवासीला मान्य मिळण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे.



धारणीपासून २२ कि.मी अंतरावरील घनदाट अरण्यात वसलेल्या कासमार गावाचा शेतकरी शालीकराम बुडा कास्देकर व मुलगा दाजी कास्देकर हे सर्व्हे नंबर २८ मौजा कासमारचे शेत अनेक वर्षापासून करत होते. पण आता ऑनलाईन केल्यावर नजरचीकने गावात असलेल्या नावाची (काळमा केन्डगवलाल) नोंद झालेली आहे. नविन नाव कमी करण्यासाठी गालीकरामने रामलाल मोती कास्देकर यांचेमाध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालय गाठून नाव कमी करून शालिकराम बुडाचे नाव नसल्याचे नोंद करण्याची मागणी केली होती. या अनुशंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाने ७मार्च २०२५ रोजी पत्र आदेशीत करून तहसिलदार धारणी यांना या प्रकरणी कार्यवाही करण्याचे निर्देशदिले. तहसिलदार प्रदीपशेवाळेयांनी तलाठी फुलमालीयांनापत्र प्रेश्रीत करून १५ मार्च रोजी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. या विषयी जिल्हाधिकारी व धारणी तहसिल कार्यालयाने तातडीने प्रशासकीय कारवाई केल्याने शासन प्रशासनतील पारदर्शी व प्रभावीपण समोर आलेले आहे. शालीकराम व दाजी कास्देकर पण सुखाविलेले आहेत.अनेक वर्षापासून मालकी हक्कापासून वंचित कास्देकर कुटूंबाला पारम्पारिक शेतीचा हक्क मिळण्याचा व सोबतच कृषी विकासाचा हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याने महसुल विभागाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## सकल मातंग समाजाची उद्या सभा : अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण जनजागृती अभियानास होणार प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**




सर्वोच्च न्यायालयाने एक ऑगस्ट २०२४ रोजी अनुसूचित जातीचे अ बकड असे वर्गीकरण करण्यासाठी राज्य शासनास निर्देश दिले आहेत. त्यावरून शासनाने बदल समितीची स्थापना केली आहे. ही समिती अनुसूचित जातीच्या लोकांचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय अभ्यास करून शासनास अहवाल सादर करणार आहे. मात्र अद्यापही समितीने अभ्यास करून अहवालसादर केला नाही. जनजागृती करण्याकरिता शनिवारी (ता. २९ मार्च) रोजी जोशी हॉल, राजकमल चौक येथे सकाळी १० वाजता सभेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती गणेशदास गायकवाड यांनी गुरुवारी (ता. २७) पत्र परिषदेत दिली.अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचा लढा सातत्याने मातंग समाजातील अनेकांनी दिलेला आहे.त्या लढ्याचे फलित म्हणून सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाला निर्देश दिले आहेत. त्याची अंमलबजावणी होण्यासाठी सकल मातंग समाज संघटित झाला असून एक मेपर्यंत वर्गीकरण करून मातंग समाजाला योग्य न्याय न दिल्यास २० मे रोजी सकल मातंग समाज आजाद समाज मैदानावरून विधानभवनावर भव्य मोर्चा काढणार असल्याचे समन्वयक देवीलाल अवचार यांनी सांगितले.सकल मातंग समाजाच्या सभेला समाजातील माजीमंत्री, खासदार, आमदार, विविध संघटनांचे प्रमुख उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या सभेला मातंग समाजाच्या विविध सामाजिक, राजकीय संघटनांच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. रुपेश खडसे यांनी केले.पत्रपरिषदेला देवीलाल अवचार, नामदेव झोंबाडे, डॉ. रुपेश खडसे, गणेशदास गायकवाड, विजय गायकवाड, बंडू जोंधळे, रवी वानखडे, पंकज जाधव, अनिल सोनटक्के, गौरवा गवळी, वैभव इंगोले उपस्थित होते.

## मा.जि.प्र चा कारनामा; कॉँक्रीट रोडवर लागला झरा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**



अमरावती शहरातील स्थानिक पार्वती नगर एक मधील सिमेंट कॉँक्रेट रोडवरील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या मुख्य जलवाहणीचा पाईप लिकेज मुळे कॉँक्रेट रोडवर अक्षरशा पाण्याचा झरा लागला आहे तर दुसरीकडे उन्हाळ्यात जिथे पशुपक्षी व मानवाला पाण्या करता भटकंती करावी लागते अशातच पार्वती नगर अकोली रोडवरील पाण्याचा जणू झरास लागलेला आहे या झऱ्यामुळे परिसरातील मुख्य रस्ता असलेला अकोली रोड अक्षरशा पाण्याखाली आला आहे मात्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चा एकही कर्मचारी येथे येथे आला नाही याच परिसरातील जुनी वस्ती असलेले महादेव नगर ,अंबा विहार, आंबा कॉलनी या परिसरात पाण्याचा दाब नसल्यामुळे नागरिकांना पाणी मिळत नाही तर दुसरीकडे भर उन्हाळ्यात रस्त्याने पिण्याचे पाणी वाया जात आहे याला जबाबदार कोण असा सवाल परसरातील नागरिक आता उपस्थित करीत आहे.

## रविवारला पाडवा पहाटेला सुरेल मंजुळ स्वरांची मेजवानी

### उज्ज्वल परंपरेची पाडवा पहाट ; धामणगाव येथील वंदे मातरम् ग्रुपतर्फे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८धामणगाव रेल्वे**

चैत्र शुद्ध प्रतिपदा गुढीपाडवा हा आपल्या भारतीयांचा नववर्ष दिवस.या नविन वर्षाचे स्वागत, सडा, रांगोळी, गुढ्या, तोरणे, मंगल वाद्य वादन या पारंपरिक पद्धतीने तर आपण करतोच,पण उगवत्या सूर्याच्या साक्षीने, सूर व स्वरांना सोबत घेऊन नववर्षाचे सामुहिक स्वागत करण्यासाठी

येथील वंदे मातरम ग्रुपतर्फे गुढी पाडवा निमित्त येथील नगर परिषद कार्यालयाच्या प्रांगणात पाडवा पहाट कार्यक्रमाचे आयोजन रविवारला (ता.३०) पहाटे साडे पाच वाजता करण्यात आले आहे.

चैत्राची सोनेरी पहाट... नव्या स्वप्नांची नवी लाट ...नवा आरंभ नवा विश्वास ... नव्या वर्षाची हिच तर खरी सुरुवात...

याचा प्रत्यय रविवारला(ता.३०)येणार आहे. निमित्त आहे,वंदे मातरम् ग्रुपने आयोजित केलेल्या पाडवा पहाटेचे.गेल्या अनेक वर्षापासून वंदे मातरम् ग्रुपतर्फे पाडवा पहाटेचे आयोजन केल्या जात आहे.गुढीपाडवा हा सण महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा सण आहे. महाराष्ट्राच्या नववर्षाची सुरूवात गुढीपाडव्यापासून होते. हिंदू कालदर्शिकेप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजेच वसंत ऋतूच्या पहिल्या दिवसाला गुढीपाडवा साजरा केला जातो. या वर्षी ३० मार्चला गुढीपाडवा साजरा केला जाणार आहे. मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात मराठी नवीन वर्षाचं स्वागत केलं जातं. पारंपरिक वेषभूषा करून, घरोघरी गुढी उभारून, सार्वजनिक ठिकाणी गुढीपाडवा निमित्त रांगोळ्या, देखावे, शोभायात्रा काढून, एकमेकांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देतात आणि मराठी नववर्षाचं स्वागत केलं जातं.दरम्यान येथील वंदे मातरम् ग्रुपतर्फे पाडवा पहाट कार्यक्रमाचे आयोजन रविवारला (ता.३०) शहरातील नगर परिषद कार्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले आहे.यानिमित्ताने पहाटेला सुरेल मंजुळ स्वरांची मेजवानी मिळणार आहे.या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा,असे आवाहन वंदे मातरम ग्रुपचे अध्यक्ष दिनेश बोबडे,सर्व पदाधिकारी व सदस्यांतर्फे करण्यात आले आहे.

## 'जिवंत सातबारा' मोहीम महसूल विभागाची पारदर्शकता वाढविणारी ठरणार - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

कुटुंबातील एखाद्याचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या वारसांना शेतजमीन, मालमत्ता आपल्या नावावर करताना अनेकवेळा अडचण येते. आता मात्र मृत खातेदारांच्या वारसांना शेतजमिनीशी संबंधित अधिकार सहज आणि वेगाने मिळावेत, यासाठी राज्य शासनाकडून 'जिवंत सातबारा' मोहीम राबविली जाणार आहे. यामध्ये मृत खातेदारांची नावे कमी करून त्यांच्या वारसांची नावे सातबारावर त्वरित नोंद करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज पत्रकार परिषदेत बोलतांना दिली.

राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून १०० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत, ही मोहीम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत, सातबारा उताऱ्यावर मृत खातेदारांच्या वारसांची अधिकृत नोंदणी केली जाणार आहे. 'जिवंत सातबारा' मोहीम महसूल विभागाची पारदर्शकता वाढविणारी ठरणार आहे. यामुळे कायद्याच्या चौकटीत राहून त्वरित निर्णय घेता येणार आहे. यामुळे वेळ आणि पैशाची बचत होणार आहे. महसूल विभागाकडून स्वतःहून वारसांची नोंद करण्यात येईल.अर्जदाराने अर्ज न करता महसूल यंत्रणा पुढाकार घेणार आहे. मृत व्यक्तींची नावे सातबारावरून कमी करून वारसांची नोंद करण्यात येणार आहे.तहसीलदारांची समन्वय अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाणार असल्याचे हि बावनकुळे म्हणालेत. यासोबतच अमरावती जिल्हा हा संपूर्णतः टीबी मुक्त करणार असल्याचे ते यावेळी म्हणाले तर अमरावती जिल्ह्यातील कायदाव सुव्यवस्था, जलसंधारण, पांदण रस्ते,पावसाळ्यात उद्भवणारी पूर परिस्थिती यावर आपण उपाय योजना करणार असल्याचे ते यावेळी म्हणाले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र ,महापालिकेचे आयुक्त सचिन कलंत्री,जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी अमरावती जिल्ह्याचा १०० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत सविस्तर माहिती दिली. यावेळी अम्दर प्रताप अडसड, केवलराम काळे, प्रवीण तायडे, प्रवीण पोटे - पाटील उपस्थित होते.



**वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करणार ?**

१ ते ५ एप्रिलपर्यंत प्रत्येक गावातील तलाठी मृत खातेदारांची यादी तयार करून मोहिमेद्वारे ही प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.राज्य शासनाने १९ मार्च २०२५ रोजी यासंदर्भात निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात ही मोहीम १ एप्रिल २०२५ पासून राबविण्याचा आदेश दिला असल्याचे बावनकुळे म्हणालेत.

**अशी असणार मोहीम**

महसूल विभागाकडून स्वतःहून वारसांची नोंद करण्यात येईल

अर्जदाराने अर्ज न करता महसूल यंत्रणा पुढाकार घेईल

मृत व्यक्तींची नावे सात-बारावरून कमी करून वारसांची नोंद केली जाईल

ही संपूर्ण प्रक्रिया फक्त दीड महिन्याच्या कालावधीत पूर्ण केली जाणार आहे

## गुढी पाडव्याला होणार अध्यक्षाची घोषणा

### जिल्हा वकील संघाच्या निवडणूक, मतमोजणी आता ३० मार्चला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**




स्थानिक जिल्हा वकील संघाच्या निवडणूकीची चुरस आता अंतिम टप्प्यात आहे. २९ मार्चला होणाऱ्या निवडणूकीत ११ पदांसाठी २२ इच्छुक उमेदवार निवडणूक रिंगणात आहे. २९ मार्चला निवडणूक झाल्यानंतर त्याच दिवशीरात्री निकाल जाहीर होणार होता. परंतु, आता २९ ऐवजी गुडीपाडव्या दिवशी ३० मार्चला जिल्हा वकील संघाच्या अध्यक्षाची घोषणा होणार आहे. याबाबत आज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उमेदवारांसोबत बैठक घेतली. आजच्या बैठकीनंतर ४० सहाय्यक आता प्रचार करून शकणार नाही.

अमरावती जिल्हा वकील संघाच्या अध्यक्ष पदासाठी २, उपाध्यक्ष पदासाठी ३, सचिव पदासाठी ३ व कार्यकारणी सदस्य पदासाठी १३ अशा एकूण ११ पदांसाठी २४ इच्छुकइच्छुक उमदेवारांनी आज आपले नामांकण निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. रामपाल कंलत्री व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. शहजाद यांच्याकडे ११ ते १ वाजेच्या सुमारास दाखल केले होते. अर्जाच्याछाणणीनंतर २२ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे आहेत. अध्यक्षपदासाठी ॲड. सुनील देशमुख, ॲड. हरीश निंबाळकर, उपाध्यक्ष पदासाठी ॲड.विनोद दशस्त्रे, ॲड. आशिष लांडे, सचिव पदासाठी ॲड. अमोल मृणाल, ॲड. नासिर शहा, ॲड. सीमा तोंडरे, सदस्य पदासाठी ॲड. विद्या मानके, ॲड. सचिन पंडीतकर, ॲड. किरण येवले, ॲड. गजानन मनोहरे, ॲड. चंद्रमोहन मिसाळ, ॲड. आशिषसिंग परिहार, ॲड. पुनम रिठे, ॲड. सुमित शर्मा, ॲड. विशाखा तागडे पाटील, ॲड. ऋषीकेश उपाध्ये हे उमदेवार जिल्हा वकील संघाच्या निवडणूक रिंगणात आहेत. २९ मार्चला निवडणूक झाल्यान्तर त्याच दिवशी रात्री निकाल जाहीर होणार होता. परंतु, आता २९ ऐवजी गुडीपाडव्या दिवशी ३० मार्चला जिल्हा वकील संघाच्या अध्यक्षाची घोषणा होणार आहे.